# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००९ |
| वर्ष | : | दहावे |
| अंक | : | ५ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १४०**

MAHMAR/ 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

दिशा

वर्ष दहावे / अंक ५ / एप्रिल २००९

# संपादकीय

## सामूहिक विश्वासाला तडे

समाजाचा असा एक सामूहिक विश्वास असतो. या विश्वासाच्या आधारावर समाजाची धारणा, समाजाच्या वाटचालींची दिशा अवलंबून असते. मात्र या विश्वासाला तडे जायला लागतात तेव्हा समाजाला हादरे बसायला सुरुवात होते. गेली काही दशके जग हे वास्तव अगदी जवळून अनुभवत आहे. जागतिकीकरणाच्या लाटेमध्ये चलन, माणसे आणि वस्तू या सर्वांचेच देशांतरण सोपे होत गेले आहे. याचे काही फायदे असले तरी काही तोटेही आहेत. समता, बंधुत्व अशी मूल्ये असोत व कुटुंब संस्थेसारख्या पुरातन संस्थांचे अस्तित्व असो, यांना हादरे बसायला सुरुवात झाली. यंत्रांमुळे जे बदल घडून आले त्यांनी माणसाचे रूपांतर यंत्रांमध्ये केले. त्यामुळे माणूस यंत्राधीन झाला. भावभावना माणुसकी यांचे अधिष्ठान असणारी जुनी मूल्ये कोलमडायला लागली.

याचा परिणाम दुर्जन माणसे सक्रिय बनण्यात झालेला दिसून यायला लागला. पैसा हे विनिमयाचे साधन आहे ही सर्वमान्य बाब आहे. पण आजच्या मूल्यव्यवस्थांच्या ऱ्हास काळात पैसा हे केवळ विनिमयाचे साधन न राहता माणसे विकत घेण्याचे आणि शोषण करण्याचे अमर्याद सामर्थ्य देणारे साधन बनले आहे. दुर्दैवाने सक्रिय बनलेल्या दुर्जनांच्या हातात हे साधन आहे. याचा अपरिहार्य असा परिणाम कला संस्कृतीसह समाजकारण, राजकारण आदी सर्वच क्षेत्रांवर होत आहे. स्वातंत्र्योत्तर भारतातील निवडणुकांचा इतिहास हा पैशाच्या दुरुपयोगाचे वाढते प्रमाण याच्याशी संलग्न आहे. व्यवस्थापनशास्त्रात इंग्रजीतील 'पाच एम' चे महत्त्व (मॅन, मटेरियल, मशीन, मार्केट, मनी) आजच्या सामाजिक जीवनात तीन एम पुरते बदलून, मनी पॉवर, मसल पॉवर व माफिया पॉवर या तीन एम् मध्ये सामावले आहे. पैशाबरोबरच दहशत व गुंडगिरी यांचे वाढत चाललेले प्रमाण पाहता हे सहज लक्षात येते.


यामध्ये प्रस्थापित असणारी व शोषण करणारी जी मंडळी असतात त्यांना परिवर्तन नकोच असते. आपले उपद्रवमूल्य टिकावे, वाढावे यात त्यांना रस असतो. यासाठी लहान मोठ्या सणांचे वा पुण्यतिथ्या, जयंत्यांचे निमित्त शोधून ही माणसे स्वत:चे तथाकथित नेतृत्व प्रक्षेपित करत राहतात. अशा माणसांनी रूढ केलेले मापदंड हीच नव्या पिढीच्या दृष्टीने संस्कृती

(पृष्ठ क्रमांक ४० वर)

# डॉ. वा. ना. बेडेकर जीवनपट

| | |
|---|---|
| २०/२/१९१७ | गोवळ (जि. रत्नागिरी, तालुका राजापूर) येथे जन्म (शनिवार व महाशिवरात्र होती.) |
| १९३६ | मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण |
| १९४१ | एल्. सी. पी. एस्. ही वैद्यकीय पदवी (सुवर्णपदकासह) मिळाली. |
| १९४२-४३ | डहाणू, उंबरगाव येथे वैद्यकीय व्यवसायास प्रारंभ |
| १९४४ | विवाह. याच वर्षी विलेपार्ले येथे व्यवसाय |
| १९४५ | ठाण्यात नौपाड्यात दवाखाना सुरू झाला. याच वर्षी शैला बेडेकर यांचा जन्म (१३नोव्हें.) |
| १९४७ | डॉ. विजय बेडेकर यांचा जन्म (९ ऑक्टोबर) |
| १९४९ | सौ. माणिक (बापट) यांचा जन्म (२६ मे) |
| १९५० | सध्याचे हॉस्पिटल. नारायण भुवनच्या तळमजल्याचे बांधकाम |
| १९५२-५३ | उत्कर्ष मंडळाची स्थापना |
| १९५७ | विद्या प्रसारक मंडळाच्या पुनर्रचित कार्यकारिणीचे अध्यक्ष डॉ. बेडेकर विद्यामंदिर (प्राथ. विभाग) प्रारंभ |
| १९५९ | शाळेचा माध्यमिक विभाग चालू झाला. |
| १९६२ | लोकसभेची निवडणूक लढविली. |
| १९६९ | कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाची स्थापना |
| १९७२ | टी.एम.सी. विधी महाविद्यालयाची स्थापना |
| १९७३ | व्यवस्थापन विभागाची सुरुवात |
| १९७५ | विज्ञान महाविद्यालयाचे विभक्तीकरण |
| १९७६ | सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमाच्या शाळेची सुरुवात |
| १९७९ | भारत सहकारी बँकेची स्थापना (२९ एप्रिल) |
| १९८३ | विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन सुरू झाले |
| १९९९-२००० | बांदोडकर महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे वर्ग सुरू |
| २०००-२००१ | जोशी-बेडेकर महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे वर्ग सुरू |
| २००४ | सत्कर्म प्रतिष्ठानाची स्थापना |
| २००४ | देहावसान (१४ एप्रिल दुपारी २.२० च्या सुमारास) |

(संकलन श्री. शरद लळित)




## वर्ष दहावे / अंक ५ / एप्रिल २००९

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १४ वे / अंक १० वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मानवा समोरील प्रश्नचिन्ह | श्री. शं. बा. मठ | ३ |
| २) | या नवनवल नयनोत्सवा नि श्रवणोत्सवा (''कुरुक्षेत्र, शुकतीर्थ, हरिद्वार, ऋषिकेश'' या सत्संग सहलीत घेतलेले अनुभव) | श्रीमती आशा भिडे | ६ |
| ३) | परमेश्वराशिवाय धन व्यर्थ असते | श्री. यशवंत माने | १२ |
| ४) | भारतीय नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! | श्री. अुत्तम जोशी | १४ |
| ५) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २४ |
| ६) | शिक्षण महर्षी कै. वा. ना. बेडेकर यांच्या लेखणीतून | - | २८ |
| ७) | सहजीवनावरील वेगळे पुस्तक- द्विगुणीत | श्री. मोहन पाठक | ३० |
| ८) | 'एक रात्र शाळेत' | सौ. प्रिती कुलकर्णी | ३२ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.४०० ६०२**
दूरध्वनी : २५४२ ६२७०

टीप : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) ''विद्या प्रसारक मंडळ **A/c** दिशा'' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

# मानवा समोरील प्रश्नचिन्ह

*आनंद कसा मिळवायचा? त्याचे स्वरूप कसे असते. यादृष्टीने विचार देणारा हा लेख. आत्मानंदाच्या मार्गातील अडथळे हा लेख स्पष्ट करतो - संपादक*

**आजही समस्या सुटल्या नाहीत :**

कालप्रवाह अखंड चालू आहे. त्याबरोबरच मार्गक्रमण करणारा जीवनाचा ओघही अखंड प्रवाहित आहे. कालानुरूप मानवी जीवनात अनेक स्थित्यंतरे झाली. या बदलांमुळे सामाजिक जीवन नित्य नवीन रूप धारण करीत आहे. हे सर्व घडत असताना मानव अंतर्यामी मात्र तसाच राहिला आहे. त्याच्या अंतरंगात कुठेच बदल घडलेला नाही. वासना, आकांक्षा, सुख, दुःख, रागद्वेष, भावना, संसारात एकमेकांवर कुरघोडी करण्याची प्रवृत्ती या साऱ्यांत युगानुयुगे फरक पडलेला नाही. जीवनातल्या समस्या, या व्यवहारातून निर्माण होणारे प्रश्न सर्वकाळी मानवाला त्रस्त करत आहेत. त्यावर उपाय शोधण्याचे प्रयत्न मानव करीतच आहे. मानवासमोरील प्रश्नांना योग्य उतारा प्राप्त करण्यात मानव अयशस्वी ठरला आहे. खरे समाधान कशात आहे? नशीबाचा भाग किती? प्रयत्नांचा भाग किती? मानवाचे प्रयत्न कुठे कुंठित होतात व कुठून नशीबाचा भाग सुरू होतो? आपोआप निर्माण होण्याऱ्या दुःखाला जबाबदार कोण? व्यक्ती, समाज वा निसर्ग? सज्जनपणे वागणारा दुर्दैवी का ठरतो? दुर्जन उत्कर्ष पावताना का आढळतो? अनादी कालापासून हे प्रश्न अनुत्तरित राहिले आहेत. समाधान, आनंद, शांती, प्रेम, तृप्तता, संतुष्टता इत्यादी गोष्टी आजही दुर्लभ आहेत.

**उपनिषदांचा दृष्टिकोन :**

उपनिषदातील शिकवण मानवाला कल्याणमय आणि समाधानी जीवनाचा मार्ग दाखविते. जीवन आनंदमय बनविते. हे संपूर्ण विश्व जड आणि चेतन या तत्त्वांनी व्याप्त आहे. स्थूल व दृश्य हे अपूर्ण आहे. सूक्ष्म व अदृश्य हे पूर्ण आहे. आणि चैतन्यमय आहे. वास्तविक अपूर्ण देखील पूर्णाचाच एक भाग आहे. या चैतन्यमय आणि पूर्ण तत्त्वालाच ईश्वर असे म्हटले जाते. जगातील साऱ्या घटना या ईश्वरी सत्तेने घडतात. जरी मानवाकरवी घडताना दिसतात, तरी घडविणारा ईश्वरच आहे. हा भाव अंत:करणात स्थिर झाला म्हणजे त्या घडण्यात न घडण्याबद्दलचा द्वेषभाव अनाठायी असल्याचे ध्यानात येईल. प्रत्येक घडणे व बिघडणे यामागे ईश्वराची प्रेरणाच असते, हे जाणले असता मनाची शांती ढळणार नाही. मानवासहित सर्व वस्तूंवर सत्ता कुणाची चालत असेल तर ती फक्त ईश्वराची चालते. देहाने कर्म करावे, मनाने ईश्वराचे असावे. ईश्वराच्या स्मरणात जगणे हे आनंदी जीवनाचे रहस्य आहे. भगवंताला विसरणे हाच भोगवाद, अशांती होय. जग वा विश्व हा भगवंताचा विलास म्हणून अपूर्ण. फक्त भगवंतच पूर्ण. भगवंताचा विसर पडल्यास राहाते ती फक्त अपूर्णता. अपूर्णतेच्या चिंतनाने मानव आनंदी कसा होईल? एक भगवंत सोडून इतर सारे मिळविण्याचा प्रयत्न मानव करीत असतो. हेच मानवाचे अज्ञान. हेच दुःखाचे मूळ कारण.

**आत्मज्ञान कसे होईल :**

इंद्रियांच्या ठिकाणी शक्ती मर्यादित असते; यामुळे अमर्याद अनंत शक्तीचे दर्शन इंद्रियांच्याद्वारे होणे अशक्य. मानवी बुद्धीने स्वत: अनंत, नि:सीम अगर विशाल व्हावे. इंद्रियांची कुबडी फेकून द्यावी. तरच, ती आत्मबुद्धी कडे वळेल. अन्यथा देहात्मबुद्धी तशीच राहील. मी भगवंताचा

आहे या दृढ भावनेने देहबुद्धी कमी होईल; देहाचे सारे व्यवहार शांतपणे आणि द्रष्टेपणे पाहता येतील. देहबुद्धीतून होणारा संकुचित व्यवहार बदलून जाईल. आणि विशाल भूमिकेतून व्यवहार घडू शकेल. जगातील साऱ्या दृश्य वस्तूंमागे आत्म सत्ता कार्य करते त्या सत्तेला शरण जाऊन आपल्या वाटेला आलेले काम कर्तव्यबुद्धीने करीत राहावे. जागृती, स्वप्न, सुषुप्ति या तीनही अवस्थांत भगवंताचा विसर पडू न देणे हे उपासना पक्वतेचे लक्षण आहे. यालाच अनुसंधान म्हणतात. यामुळेच अंत:करणाची विशालता निर्माण होते. असा माणूस सर्वांनाच हवा हवासा वाटतो. इंद्रियांना आणि विकाराना स्वैर उधळू देऊन चित्ताचे समाधान होणे अशक्य. कर्म म्हणजे आतील व्यवस्थेचे व्यक्त रूप. मानवी जीवन आनंदी बनण्यास आत्मज्ञानावाचून अन्य उपाय नाही. अनात्म वस्तूतून आनंद कदापि मिळणार नाही हे पक्कपणे मनात ठसले पाहिजे.

**आनंदमीमांसा :**

प्रसन्न होणे, तृप्त होणे, समाधान पावणे याला आनंद म्हणतात. यात आ+नन्द-समाधान, प्रसन्नता, तृप्ती, थोडक्यात आनंद म्हणजे प्रसन्नता, तृप्त वा, समाधान याची परिसीमा होय. पूर्ण समाधान, आत्मशांती, आत्मतृप्ती याला आनंद म्हणतात. आनन्द म्हणजे सुख नव्हे, देहाचा आराम नव्हे, प्रपंचाची सुस्थिती नव्हे, जे हवे ते मिळणे नव्हे. थोडक्यात, इंद्रियांना भावणाऱ्या अगर देहाने भोगता येणाऱ्या दृश्य वस्तूहून आनंद वेगळा आहे. आनंद देहद्वारे अनुभवावयाचा असला, तरी ती तो इंद्रियांच्याद्वारे घडत नाही. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय याच्या पलीकडे आनंद आहे. देहाला उत्तम स्थितीत सुख मिळेल आनंद मिळेलच असे नाही. देहाची स्थिती वाईट असूनही या चार कोषांपलीकडे जाण्याची विद्या ज्याला साधली आहे त्याला भौतिक सुख जगाच्या दृष्टीने नसतानाही आनंदाचा अनुभव प्राप्त होऊ शकेल.

**आनंद म्हणजेच जीवन :**

आनंद बुद्धीला प्रकाश, मनाला चेतना, प्राणाला जिवंतपणा आणि देहाला सुखानुभवास समर्थ करतो. आनंदामुळे इतर चारही कोष टवटवीत होतात. आनंद नसताना कोमेजतात. निस्तेज होतात. म्हणूनच, आनंद सर्वांना प्रिय. आनंद ही प्राणिमात्राच्या जीवनाची पार्श्वभूमी आहे. मात्र हा आनंद सर्व वस्तूतून सारखाच प्रगट होत नसतो. वनस्पतीतील आनंद दगड मातीतून आढळणार नाही. तसेच इतर प्राण्यांतूनही आढळणार नाही. माणसात व्यक्त होणारा आनंद सर्वाधिक आहे. परंतु माणसां-माणसातही तो कमी अधिक प्रगट होत असतो. माणसाचा अनुभव जितका खोल, व्यापक, प्रकट, अर्थपूर्ण, तितका त्याच्यातून व्यक्त होणारा आनंद शुद्ध स्वरूपाचा असतो.

**आनंदाची श्रेणी :**

देह आराम आणि बाह्यवस्तू उपभोग यातच आनंद मानणाऱ्याची श्रेणी निम्न समजावी. देह अगर इंद्रियां-पलीकडे ज्याची दृष्टी जात नाही, तो मनुष्य रूपाने पशुजीवन जगतो. मनुष्यरूपेण मृगा : चरन्ति। ऐश्वर्य, पैसा, घरदार इत्यादिकात रमणे ही त्यावरील दुसरी पायरी मानावी. ही दुसरी श्रेणी. खेळ करमणूक छंद इत्यादीत रमणे ही तिसरी पायरी. मित्रांची संगत, सामाजिक जीवन जगावेसे वाटणे व जगणे ही चौथी श्रेणी. गायन, वादन, चित्रकला, नृत्य, नाट्य आदि कलांची उपासना यात रमणे ही पाचवी पायरी, विज्ञान तत्त्वज्ञान निरनिराळ्या शास्त्रांचे अध्ययन यात रमणे ही सहावी पायरी, विद्वतेपेक्षा शील संपन्नता, जीवनमूल्ये टिकविणे ही सातवी पायरी, थोडक्यात कलावंत, शास्त्रज्ञ, पंडित, शीलसंपन्न पुरुष हे सर्व पहिल्या चार कोषांपर्यंतचा आनंद उपभोगतात. आत्मानंद ही शेवटची पायरी ही आठवी पायरी. संत जनच या पायरीवर आरूढ होतात. सर्व अध्यात्म ज्ञानाचे व ते ज्ञान प्रतिपादन करणाऱ्या ग्रंथांचे हेच प्रयोजन आहे. सत् पुरुष दोन प्रकारचे संभवतात. पहिल्या प्रकारात

सर्व परिस्थितीत अंतर्यामी पूर्ण समाधानी आणि समचित्त. दुसऱ्या प्रकारात अंतर्यामी अचल राहूनही बाह्य परिस्थिती बदलणारा. देशकालानुरूप प्रयत्न करणारा. काही आत्मन: मोक्षाय झटतात काही स्वत:च्या मुक्तीबरोबर इतरांचे कल्याण साधतात. आत्मन: मोक्षाय जगत् हिताय च।

**साधकासंबंधी काही गोष्टी :**

साधकाच्या अंत:करणात अध्यात्मज्ञान बिंबण्यासाठी तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

१) जगातील साऱ्या घडामोडी ईश्वराच्या इच्छेने घडतात हा विश्वास दृढ झाला पाहिजे.

२) आपल्या वाट्यास आलेले कर्तव्य प्रामाणिकपणाने आचरणे हाच श्रेयस्कर मार्ग.

३) कर्तव्याचरणातून प्राप्त होत असलेल्या फळातच समाधान मानणे.

या जाणिवेतून माझा पालनकर्ता, मालक, ईश्वर आहे ही साधकाची निष्ठा तयार होते. मला प्राप्त होणारी परिस्थिती त्याच्या इच्छेने व सकळ कल्याणासाठीच असते ही भावना दृढ होते. कर्तव्याचे फळ तोच देतो व तोच माझा रक्षणकर्ता आहे याचे नित्य स्मरण होते. ही भूमिका ज्याच्या ठिकाणी तयार होते असा साधक आत्मानंद मिळवू शकतो.

**मनातील विपरीत कल्पना अज्ञानमूलक :**

मानवी जीवनात नित्य अनेक घटना घडत असतात. त्यांचा अर्थ लावण्याचा मानव प्रयत्न करत असतो. काही गोष्टी उलगडतात, काही ध्यानात आल्यासारख्या वाटतात, परंतु उलगडा होत नसतो. ज्यांचा बोध होत नाही व ज्यांचा उलगडा होऊ शकत नाही त्याला दैव म्हणतात. ज्या आपातत: घडतात त्याला आपत्ती म्हणतात. येणेप्रमाणे अनेक गोष्टींची उपपत्ती न लावता आल्याने मानव निराश होतो. प्रयत्नांवरील त्याचा विश्वास उडतो. दैवावर हवाला ठेवून स्वस्थ बसतो. याने स्वत:तील क्रियाशक्ती निस्तेज होते. तो दु:खी, कष्टी व चिडचिडा होतो. अप्रामाणिकतेने वागणारा माणूस भौतिक संपन्न होताना पाहून आपण प्रामाणिकपणे वागून काय मिळविले. फक्त मूर्खपणा पदरी घेतला असे त्याला वाटते. असा विचार येणे स्वाभाविक आहे. मात्र वास्तविक आहे का याचा विचार केला पाहिजे. ज्याला भोगसंपन्नता हीच प्रगती वाटते तो भोग वस्तूंचा संग्रह हाच विचार करतो. या वस्तूंच्या उपलब्धीने सुखी होईन ही त्याची धारणा असते. जीवन मूल्याची महती त्याच्या ठिकाणी अभावानेच आढळते. जीवनमूल्यांच्या दृष्टीने ही त्याची भौतिक प्रगती गौण ठरते. भल्याबुऱ्या मार्गाने संपत्ती गोळा करणाऱ्या मानवाचे जीवन वरून समाधानी व सुखी दिसते. मात्र वस्तुस्थिती तशी नसते. सतत एक प्रकारचे भय त्याला ग्रासत असते. टांगती तलवार अपल्या डोक्यावर असताना पलंगावर कोणी शांत झोपू शकेल काय? हा सुखाचा आभास म्हणजे प्रगती असे म्हणावयाचे काय? हे विचारपूर्वक ठरवावे लागेल. हा सुखाचा आभासच त्याला अधिकाधिक दु:खाकडे नेणारा असतो. हे त्याला कळत नाही, हेच त्याचे अज्ञान.

**अंध:कारातून प्रकाशाकडे जा :**

उपनिषदे मानवाला आवर्जून सांगतात - तमसो मा ज्योतिर्गमय। अंधार नव्हे प्रकाशाकडे जा. अज्ञान नव्हे ज्ञानाकडे जा. क्षणभंगुरतेतून चिरंतन तत्वाकडे जा. तरच आपल्या मनातील अज्ञान नष्ट होईल. सुखाभासाऐवजी आनंद पथावर मन धाव घेऊ लागेल. जीवनात खराखुरा आनंद नांदू लागेल. साऱ्या मानवी समस्यांचा अशा प्रकारे निरास करता येईल. जीवनात आनंद हीच सर्वश्रेष्ठ प्राप्ती.

**श्री. शं. बा. मठ**

६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

# या नवनवल नयनोत्सवा नि श्रवणोत्सवा

## ("कुरुक्षेत्र, शुकतीर्थ, हरिद्वार, ऋषिकेश" या सत्संग सहलीत घेतलेले अनुभव)

*सत्संग सहलीचा हा म्हटला तर साधा, नाहीतर वेगळा अनुभव. आयुष्य प्रवासातले असे क्षण माणसाला समृद्ध करतात. म्हणूनच हे वर्णन - संपादक*

मला माझ्या मैत्रिणीनं असंच विचारलं नि मी चटकन हो म्हटलं. मला प्रभावित केलं कुरुक्षेत्रानं. शुकतीर्थही अनोखं तीर्थक्षेत्र होतं. नि तिथे सात दिवस भागवत सप्ताह होणार होता. पंधरा दिवसाच्या या सहलीचं आयोजन केलं होतं ठाण्याच्या विष्णुनगर मधील श्री. व सौ. गलांडे या दाम्पत्यानं. २ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी २००८ ला ही ट्रीप जाऊन आली. दरवर्षी याच सुमाराला या ठिकाणी ते अगदी अल्पखर्चात ट्रीप काढतात. ज्येष्ठ नागरिकांना त्यात आणखी सवलत असते. त्यात दोन वेळा शाकाहारी भोजन (स्वयंपाकी बरोबर असतो.) शेअरिंग निवास व्यवस्था, ३x२ बसने स्थलदर्शन, रेल्वेत थ्री टायरने प्रवास, एकदा नास्ता, तीनदा चहा यांची सोय होती.

जानेवारीत उत्तरेत थंडीची लाट, हिमवृष्टी वगैरे झाल्यामुळे (मुंबईतही ती जाणवत होतीच तेव्हा) अंथरूण पांघरूण, भरपूर गरम कपडे व स्वत:ची औषधे बरोबर घ्यायला सांगितली होती. रात्री १२ ला 'दादर अमृतसर' एक्स्प्रेसने २ तारखेला ठाण्याहून निघालो. ४ ता. सकाळी कुरुक्षेत्रला पोहचणार होतो. डबे रिझर्व्ह होते. रात्री तर झोपून गेलो. दुसरा दिवस गाडीत मजेत गेला. गप्पा, टप्पा, भेंड्या, पत्ते झाले. डबे सर्वांनी आणले होते ते वाटून खाल्ले. पन्नास पासून पंचाहत्तरीपर्यंतचे लोक होते. श्री. व सौ. गलांडे सर्वांची आपुलकीने चौकशी करीत होते. सर्वांची चढल्यानंतर नि उतरल्यानंतर ते हजेरी घेत होते. सर्वांना सामानाला लावायला केशरी फीत त्यांनी दिली होती. सामान ओळखू यावे म्हणून. प्रत्येक वेळी प्रत्येक ठिकाणी गलांडे पतीपत्नी इंजिन नि गार्ड सारखे सर्वांच्या पुढे मागे राहून जातीने लक्ष ठेवत होते. विचारपूस करत होते.

गाडी दुसऱ्या दिवशी तशी कुरुक्षेत्राला उशीराच पोचली. तीन चार तास लेट. महाभारताचं युद्ध झालं, विशेषत: जिथे कृष्णानं गीता सांगितली अर्जुनाला तिथे आपण आलोय हा आनंद मनात मावत नव्हता. मनोमन भगवंताला नमस्कार करून खाली उतरलो. बाहेर बस तयारच होती न्यायला. कुरुक्षेत्र गाव पहातच आम्ही एका मोठ्या सरोवरापाशी थांबलो. ते ब्रह्म सरोवर होते. युद्धानंतर म्हणे याच सरोवरात दुर्योधन लपला होता. सरोवर कसले सागरच वाटला. संपूर्ण धुक्याने वेढलेला असल्यामुळे पाणी कुठलं नि आकाश कुठलं ओळखू येत नव्हतं. समोरच्याच श्री जयराम विद्यापीठात आम्ही आत शिरलो. तिथे बोर्डवर आमची रूम व्यवस्था लिहिली होती. त्याप्रमाणे चहा घेऊन रूमवर गेलो. सगळी आन्हिके आटोपून मगच जेवायला खाली आलो. आता साडेबारा झाले होते. दोनला पुढे कुरुक्षेत्र दर्शनला निघायचे होते. दुपार वाटतच नव्हती इतकं धुकं पसरल होतं. थंडी मी म्हणत होती. गार बोचरे वारे वहात होते. जेवायला खाली पट्टे अंथरले होते. पण जमिन बर्फासारखी थंडगार होती. जेवण सुग्रास व गरमागरम होते. पटापट जेवलो. जोशी केटरर ट्रीप बरोबर होते. शिवाय मदतीला धर्माधिकारीबाई व एक रवि नावाचा पस्तीस चाळिशीचा हरकाम्या माणूस बरोबर होता. 'रवि जरा बॅग धर रे, जरा पाण्याची बादली नेऊन दे', सारखं 'रवी, रवी' सर्वांच्या हाका यायच्या नि तो 'ओ' आलोच' म्हणत अगदी



**कुरुक्षेत्रावरील ब्रह्मसरोवरात आपलेच प्रतिबिंब न्याहाळणारा ''अजान वृक्ष'' हे जुळे झाड नकुल सहदेवाचे.**



**शुकतालचा पाच हजार वर्षापूर्वीचा वटवृक्ष - जिथे शुकमुनींनी परिक्षित राजाला भागवत कथा सांगितली**

लगबगीनं खाली वर करायचा-पळायचा. पु.लं.चा नारायणच वाटला मला, व्यक्ती आणि वल्ली मधला.

कुरुक्षेत्रात खूप विस्तीर्ण मोकळी मैदानं दिसत होती. दरवेळी मैदान दिसलं की वाटायचं हेच असेल का कुरुक्षेत्र! ते असेल का कुरुक्षेत्र! अखेर खऱ्या कुरुक्षेत्रावर उतरलो. पर्यटन केंद्रानी खूप छान विकास केला आहे या पौराणिक स्थळाचा. खूप प्रेक्षणीय आहे हे स्थळ. समोरच पाच हजार वर्षापूर्वीचा प्रचंड मोठा अश्वत्थ वृक्ष होता. त्याच्या भोवती पार बांधला होता आम्ही पायऱ्या चढून वर गेलो. पादत्राणं काढून, पायात मोजे ठेवून वर गेलो. पण त्या थंडगार फरशीवर पाय ठेववत नव्हता. इथेही ते ब्रह्म सरोवर होते. त्यावरून हिमकणांची बरसात होत होती. गार वारे सुटले होते. 'थंडी प्रुफ' असूनही हू ऽऽऽ हू ऽऽ होत होते, हुडहुडी भरत होती.

पाच हजार वर्षापूर्वीचा अश्वत्थ वृक्ष अगदी डेरेदार हिरवागार असा बहरलेला दिसत होता. त्याला लोकांनी गंडे दोरे बांधलेले होते. हार फुले वाहिली होती. आम्ही पण प्रदक्षिणा घालून त्याला नमस्कार केला. त्याच्या शेजारीच एका काचेच्या भव्य बंद खोलीत आपल्याला कृतकृत करणारा डोळ्याचं जन्माचं पारणं फेडणारा श्रीकृष्णार्जुनाचा भव्य दिव्य रथ होता. हात जोडून माथा झुकवून बसलेला अर्जुन नि हातातला कासरा (लगाम) सोडून मागे वळून त्याला गीता सांगणारे भगवान श्रीकृष्ण. पांढऱ्या शुभ्र सात घोड्यांचा कुरुक्षेत्राच्या मध्यभागी उभ्या असलेल्या त्या दिव्य दैवी रथावर नजर ठरत नव्हती. पाऊल निघत नव्हते. देहभान हरपून त्याकडे पहाताना किती डोळ्यात साठवू नि किती हृदयात जपून ठेऊ असे झाले होते. माणसाएवढ्या संगमरवरी सुबक मूर्ती, त्यांना भरजरी सुंदर पोषाख, दागिने सगळंच अप्रतिम, अवर्णनीय होतं.

दूरवर कुरुक्षेत्राचा मैलोगणती अफाट पसरलेला दृष्टी पोचणार नाही असा परिसर दिसत होता. धुक्यामुळे दूरचे दिसत नव्हते. एवढे कुरुक्षेत्र धुक्याने वेढले होते, गारठले होते. हे सर्व पाहून जन्म धन्य झाल्यासारखे वाटले. तिथे आल्यापासून सूर्यदर्शन झालेच नव्हते. संयोजकाची तेवढ्यात शिट्टी वाजली. चला निघा अजून खूप पहायचे आहे.

उद्या परत सकाळी आठला आम्ही 'संपूर्ण गीता' पारायण करायला इथे येणारच होतो. नंतर आम्ही भीष्म बाणांच्या शैय्येवर पडले आहेत, पाच पांडव श्रीकृष्णासह भोवताली उभे आहेत, तहानलेल्या भीष्मांसाठी अर्जुन बाण मारून गंगा उत्पन्न करून धार त्यांच्या तोंडात पाडतोय असे सुंदर मूर्तीचे नस्कातारी मंदिर पाहिले. भीष्मकुंड, बाणगंगा, नरकातारी तीर्थ वगैरे पाहिली. पाच पांडव, श्रीकृष्ण, द्रोणाचार्य यांची स्वतंत्र मंदिरेही होती. मंदिरांचा परिसर सुंदर, पवित्र नि मुख्य म्हणजे कमालीचा स्वच्छ होता. गाईडपण काही ठिकाणी माहिती सांगत होता. हरियाना शक्तिपीठ, श्री देवीकूप भद्रकाली मंदिर, बिर्ला गीता मंदिर, कुरुक्षेत्र मनोरमा, गीताधाम, सन्निहीत सरोवर अशी कितीतरी एकापेक्षा एक सुंदर मंदिरे नि ठिकाणे पाहिली, रस्त्यात चौकावर अर्जुन, द्रोणाचार्य, भीष्म तसेच अहिल्यादेवी होळकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पण पुतळे दिसले. इथे मोकळी मैदाने, मुबलक जागा पण लोकच कमी. इथे लोक वैदिक पाठ व वेदाध्ययन शिकतात. शिवाय यात्रेसारखी मंदिरासमोर सर्व देवाच्या सामानांची, खेळण्यांची वगैरे दुकाने, चहाचे ढाबे दिसत होते. हाच इथला व्यवसाय असावा.

इथल्या सायकल रिक्षा, ऑटो मुंबई पेक्षा वेगळ्या होत्या. धष्टपुष्ट गाईगुरे गोठे यावरून इथे दुग्ध व शेती व्यवसायही लोकांचा चरितार्थाचा भाग असावा हे प्रामुख्याने दिसत होते. इथे फकीरही खूप होते. महर्षी पराशर विद्यापीठ, श्रीकृष्ण संग्रहालय, श्रीकृष्ण पुस्तकालयही दिसले, बसमधून जाताना. शेवटी आमच्या निवासस्थानाजवळ बस थांबली नि आम्ही सर्व समोरच्या विशाल ब्रह्मसरोवराकडे धावलो. याच सरोवरात लपलेल्या दुर्योधनाचा भीमाने गदेने वध केला, युद्ध संपल्यानंतर.

दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा कुरुक्षेत्रावर अश्वत्थ वृक्षापाशी आलो. जिथे गीता सांगितली गेली त्याच ठिकाणी बर्फाच्या लादीसारख्या थंडगार संगमरवरी फरशीवर बसून आम्ही गीता पठणाला सुरुवात केली. शेजारच्या ब्रह्म सरोवरावरून थंडगार वारे अंग बधिर करत होते. तोंडातून शब्द फुटत नव्हता. बाराला पारायण संपले. आता जेवून पुढे हरिद्वारला जायचे होते. मागेच मी या ठिकाणी गीतेच्या एका अध्यायावर प्रवचन करण्याची इच्छा संयोजकांजवळ व्यक्त केली होती. त्याप्रमाणे कालच इथे प्रवचन करणार होते पण गाडी लेट झाल्यामुळे ते राहिले. तरी सौ. गलांडे मला म्हणाल्या, तुम्ही पूर्ण अध्यायावर नाही पण पंधरा मिनिटे इथे बोला. आम्हला सर्वांनाच आवडेल ऐकायला. मी भगवंताला वंदन करून म्हटले आज तू जिथे गीता सांगितलीस तिथेच मला तुझ्या गीतेवर बोलायला मिळतेय हे मी माझे अहो भाग्य समजते. मी अठराव्या अध्यायावर पंधरा मिनिटे बोलले नि त्या अध्यायावरची माझी कविता पण गाऊन म्हटली. एरव्ही इतर ठिकाणी मी गीतेवर प्रवचने करते पण या अलौकिक संधीमुळे मी कृतकृत झाले. जन्मच धन्य झाला. आयुष्य इथेच संपले तरी चालेल, इतके मला कृतार्थ झाल्यासारखे झाले. श्री. व सौ. गलांड्यांना मी शतश: धन्यवाद दिले.

वाटेत रामरक्षा, अथर्वशीर्ष, गणपती स्तोत्र, गीतेचा पंधरावा अध्याय, भीमरूपी म्हणत आम्ही बसने हरिद्वारला आलो. तेथे प्रथम काचेचे मंदिर पावनधाम पाहिले. काचेने भिंती वेढलेल्या असल्यामुळे देव अनेक रूपात दिसत होते. पुढे गंगेवर आरती गाठायची होती म्हणून इथे न रेंगाळता

पुढे निघालो आखिल भारतीय माहेश्वरी सेवा सदनात आम्ही उतरलो. सामान रूमवर टाकले नि गंगेवर निघालो. येथे स्नानाची सोय पण आहे. या ठिकाणाला हरिची पैरी म्हणतात. घाटावर खूप उंच अशी शंकराची उभी मूर्ती आहे. घाट लोकांनी फुलून गेला होता. पंडे लोक लोकांना फुलांची भरलेला व त्यात दिवा असलेला द्रोण नदीत सोडून पितरांना पिंडदान करायला सांगत होते. ते सर्व करून आम्ही ७॥ च्या आरतीला येऊन बसलो. पलिकडच्या काठावरून घंटा व थाळ्यांच्या निनादात गंगेची आरती चालू झाली. रात्री दुथडी भरून वाहणाऱ्या काळ्याशार नदीच्या पाण्यावर साडलेले दिवे फारच सुंदर दिसत होते. विलोभनीय असं दृश्य होतं, ''या नवनवल नयनोत्सवा'' असंच सगळीकडे वाटत होतं. सारा माहोल मंगल, पवित्र होता. सुभाषचंद्र बोसांचा पुतळा याच घाटावर होता. महंत ज्ञानसिंह सेवा समितीचे कार्यालय इथे लोकांच्या निष्काम सेवेसाठी तत्पर होते.

दुसऱ्या दिवशी रोप वे ने सकाळी धुक्यातून मनसा-देवीच्या दर्शनाला गेलो. ट्रॉलीतून जातांना खालचे दृश्य खूपच मनोहर दिसत होते. धुक्याने वेढलेले डोंगर, जणू आकाशच टेकले होते. डोंगरावर फुलांचे सुंदर ताटवे, खाली पसरलेले गाव, हिरवीगार वृक्षराजी सारेच रम्य नि अगम्य वाटत होतं. कुठे पाहू नि कुठे नको असे झाले होते. वर वाटेत खूप माकडे होती. पिल्लाला पोटाशी धरून उड्या मारणारी. दुर्गा देवी नि माता पार्वती मंदिरासमोर दर्शनाला लांबच लांब रांगा लागल्या होत्या. रोप वे ने जाण्या-येण्याचा हा अनुभव फारच रोमांचकारी होता.

दुपारी ऋषिकेशला गेलो. काही अंतर गंगेच्या पुळणीतून पायी चालत गेलो. काहीजण रिक्षाने गेले. तिथे बसने पुढे जाता येत नव्हते. उंच उंच पर्वतांच्या रांगा, साथीला वाहणारी गंगा, मावळतीचे उबदार उन, मनात रामधून, सारं सौंदर्य डोळ्यांनी पिऊन घेत चालत जाणं फारच सुखद नि मनोहारी वाटत होतं. समोर पर्वतांच्या पार्श्वभूमीवर रामझूला दिसत होता. दोन्ही काठांना जोडणारा. मग पलीकडल्या तीरावर बोटीने गेलो. ऋषिकेश मंदिराच्या आवारात भिंतीवर विष्णूचे दशावतार दिसले. संपूर्ण गीता मंदिराच्या भव्य भिंतीवर लिहिलेली दिसली. कृष्ण वाटिका रंगबेरंगी फुलांनी नि वेलींनी नटलेली आहे. श्रीकृष्णाची मूर्ती पण सुंदर मनोहर आहे. तिथेच काली कमलीताले बाबांचे मंदिर, स्वर्गाश्रम, लक्ष्मणझुला, गुफा मंदिर सारेच सुंदर होते. इथे मंदिरावर सुद्धा खूप भव्यदिव्य मूर्ती साकारलेल्या आहेत. अगदी हरखून जायला होते पाहताना.

आता शुकतीर्थाला जायला बस निघाली. वाटेत योगी रामदेव बाबांचा भव्य आश्रमपण बघितला. आमच्या संयोजिका सौ. शरयूताई गलांडे या दोन सहकाऱ्यांना घेऊन आधीच शुकतीर्थावर रवाना झाल्या होत्या. तिथे पुढची व्यवस्था करायला. तेथे सात दिवसाचा मुक्काम होता. हरिद्वार पासून ६५ कि.मी. अंतरावर गंगेच्या तीरावर वसलेल्या या पवित्र तीर्थक्षेत्री श्री व्यासनंदन शुकमुनी यांनी शक संवत १७७६ चैत्र शुक्ल प्रतिपदा गुरुवार या दिवशी पाच हजार वर्षापूर्वी ८८ हजार ऋषीमुनी व ब्रह्मा विष्णू महेश आदी देवतांच्या उपस्थितीत शापमुक्त होण्यासाठी परिक्षीत राजाला 'भागवत कथा' सांगितली होती. सुंदर सुंदर बागांनी व असंख्य मंदिरांनी नटलेल हे पवित्र शुकतीर्थ म्हणजेच शुकताल.

शुकतीर्थावर 'महर्षी श्री शुकदेव रूपद्वार' या भागवत भवनात आम्ही उतरलो. पहिल्या दिवशी मूळ भागवत कथा जेथे सांगितली त्या ठिकाणाचे दर्शन घेतले. पाच हजार वर्षापूर्वीचा डेरेदार वटवृक्ष व त्याच्याखाली शुकमुनी व परिक्षित मंदिर आहे. समोरच नवीन भव्य संगमरवरी मंदिर आहे. या मंदिरात विश्वामित्र, व्यास, वसिष्ठ, वाल्मिकी या ऋषीमुनींसह श्रीकृष्ण शुकमुनी व परिक्षित राजा यांच्या मूर्ती आहेत. या परिसरात आणखीही भागवत भवने आहेत.



**शुकतीर्थवर आम्हा यात्रेकरूंची निघालेली 'भागवताची दिंडी' गंगा घाटावर आली तेव्हाचे छायाचित्र**

१२८ वर्षीय श्री कल्याणदेव महाराज यांनी या स्थानाचा जीर्णोध्दार केलाय. वेदविद्या शिकणाऱ्या मुलांसाठी म्हणून वसतिगृहे, धमार्थ दवाखाने आहेत. मंदिराच्या वर गणपतीची (४२ फुट उंच), हनुमान (७७ फुट उंच) अशा अनेक देवतांच्या मूर्ती आहेत. सात दिवस तेथे मुक्काम होता. म्हणून सर्व गाव हिंडून बघत होतो. दुसऱ्या दिवसापासून भागवत सप्ताह चालू होणार होता.

सकाळी साडे सातला टाळ मृदुंगाच्या गजरात 'जय जय रामकृष्ण हरी, विठूचा गजर हरि नामाचा' म्हणत भागवताची दिंडी मिरवत मिरवत गंगेवर आली. भागवत ग्रंथ शिरावर धरून श्री. गलांडे चालले होते. सभोवती भागवत भक्त नाम गजरात नाचत चालले होते. बायका समोर फुगड्या घालत होत्या. दुतर्फा लोक दिंडी बघायला जमले होते. सारे वातावरण प्रसन्न मंगल भागवतमय होते. प्रत्येक भक्त भागवत शिरी धरण्यासाठी उत्सुकतेनं पुढे येत होता. गंगेवर यथासांग पूजा आरती होऊन दिंडी परत भागवत भवनात आली. सकाळी सातलाच सगळ्यांचा दुसरा चहा व नाश्ता आटोपलेला होता. नाश्त्याला रोज गरमागरम नवनवीन पदार्थ असायचे. कधी पोहे, कधी उपमा, कधी बटाटे वडे, कधी डोसा, इडली, साबुदाणे वडे, खिचडी, उकड, मिसळ अशी व्हरायटी असायची. शिवाय पोटभर. जेवायला रोज पक्वान्ने, सुग्रास घरगुती जेवण. वाढायला जातीने श्री. व सौ. गलांडे असायचे. शिवाय रवी, धर्माधिकारीबाई व इतरही मंडळी आपणहून वाढायला लागायची.

सकाळी बरोबर ९ ला श्री राधे राधे भागवत भवनात प.पू.श्री. वासुदेवानंद सरस्वती महाराजांचे प्रवचन चालू झाले. 'भागवत कथेच्या जन्मस्थानी आज आपण भागवत कथा ऐकायला जमलो आहोत. ही कथा ऐकून आत्मोध्दार करण्याचा जन्म सार्थकी लावण्याचा अवसर भगवंतांनी दिलाय. सलग सात दिवस आपण भागवत कथा म्हणजेच कृष्ण लीला ऐकणार आहोत. श्रवण करणार आहोत. भागवताचे १८,००० श्लोक, १२ स्कंध नि ३३५ अध्याय आहेत. श्रोते जीवाचा कान करून ऐकत होते. कथा उत्तरोत्तर रंगत चालली होती. हे संगीत प्रवचन होते. महाराज मध्ये भजने पण गात होते. साथीला त्यांचे शिष्य होते. १२ पर्यंत प्रवचन चालणार होते मग भोजन थोडी विश्रांती नि पुन्हा तीन ते सहा प्रवचन मग आरती हरिपाठ असा साडे आठपर्यंत कार्यक्रम बांधलेला होता. मधे कोणाला विश्रान्ती ऐवजी मंदिर दर्शन, खरेदी करायची असली तरी तशी मुभा होती. कथेत कृष्ण जन्माच्या वेळी हॉल व पाळणा सजवला होता. बायकांनी पाळणा व कृष्णगीते म्हटली. किती सांगू मी सांगू कुणाला, आज गोकुळात रंग खेळतो हरी वगैरे म्हणत गुलाल उधळला. सर्वांना बारश्याच्या घुगऱ्या, पेढे वाटण्यात आले. कृष्ण रुक्मिणी विवाहही तुळशी व कृष्णमूर्ती मधे छोटास अंतरपाट धरून मंगलाष्टके म्हणून वधुवरांवर अक्षता उधळून पेढे वाटून साजरा झाला. सर्व भक्त नवीन वस्त्रप्रावरणे आभूषणे लेवून त्यादिवशी आले होते. फटाक्यांची आतषबाजी पण करण्यात आली. मग स्त्रीपुरुषांनी गाणी म्हणत फेर धरला. गलांडे पती पत्नी यातही सामील झाले होते. सर्व व्यवस्था चोख ठेवून सर्वांबरोबर नाच गाण्यातही ते पुढे असायचे. एवढी धावपळ करूनही दोघे आनंदाने

हसतमुखाने सर्वात सहभागी व्हायचे याचे सर्वांना खूप कौतुक वाटायचे.

सातव्या दिवशी कथेची समाप्ती झाली. 'तारा है सारा जमाना प्रभू हमको भी तारो॥ हमने सुना है तुमने अर्जुन को तारा। गीता का करके बहाना। प्रभू हमको भी तारो॥ महाराजांनी अशी सुंदर सुंदर हिंदी मराठी भजन म्हणून भागवत कथेच्या ज्ञानगंगेत आम्हालाही डुंबवून पावन केलं होतं. नंतर समारोप करण्यासाठी गलांडे पती पत्नींची भाषणे झाली. सौ. शरयूताई म्हणाल्या, ''भागवत कथेचा हा प्रयोग १००% यशस्वी झाला आहे. सर्व यात्रेकरूंचं एक कुटुंब झालं आहे. 'एकमेका साह्य करूं अवघे धरू सुपंथ' हे आमचे ब्रीद आहे. भागवत कथेच्या रूपानं आम्ही सर्वांना भगवत भक्तीच्या मार्गाला लावतो. बेडेकर शाळेतून मी निवृत्ती पत्करली. मुले परदेशात आहेत. आता कुठली जबाबदारी नाही. आम्हाला सत्संगाची आवड आहे नि सवड आहे. विष्णू नगरातील चव्हाण दत्त मंदिरात आमचा नेहमीच सत्संग चालतो. त्यातूनच ह्या सत्संग सहलींची कल्पना निघाली. दत्त महाराज सर्व करून घेतात. आम्ही नाममात्र आहोत.'' ''आम्ही याची कुठे जाहिरात करत नाही. सत्संग हिचा नि ट्रीपचे नियोजन माझे. ना फायदा ना तोटा या तत्वावर ट्रीप काढतो. माऊथ पब्लिसीटी हीच जाहिरात. आमचे उत्तम आयोजन पाहूनच लोक ट्रीपला पुनःपुन्हा येतात.'' श्री. गलांडे म्हणाले, ''आपल्या सर्वांचे प्रेमळ सहकार्य यावरच आमच्या ट्रीपस् प्रचंड यशस्वी होतात. नाशिक, पुणे, रत्नागिरी हूनही लोक येतात.'' यात्रेकरूंतर्फे पण आभाराची भाषणे झाली. ''आपुलकीने वागणारे गलांडे पती पत्नी, तर आम्हाला राधा कृष्णच भासले. श्री गलांडे यांचे नावही केशव आहे. उत्तम संघटन चोख व्यवस्था, आपलेपणाने चौकशी करणारी माणसं यामुळे ही ट्रीप आमच्या कायम लक्षात राहील.''

''ट्रीपला निघालो तेव्हा उत्तरेत हिमवृष्टी होत होती. थंडीची लाट आली होती. यात्रेकरू सर्व जेष्ठ नागरिक. काळजी वाटत होती. पण दत्त महाराजांच्या कृपेने ट्रीप निर्विघ्न पार पडली. आता उत्तम प्रतिसादामुळे दरवर्षी मार्च मध्ये ही शुकतीर्थ सहल निघणार आहे.'' शरयूताई समारोप करत म्हणाल्या, पुन्हा भागवतकथा सांगता दिंडी निघाली नि परतीच्या प्रवासाला निघालो.

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

●●●

### वाचा आणि विचार करा

केवळ आपुल्या स्वार्थासाठी कलह नसावा घरामधे।
आपुलकीच्या नात्या मधुनी स्नेह जपावा मनामधे॥धृ॥

येणाऱ्याला पाणी द्यावे मुखात वाणी गोड हवी।
जाणाऱ्याच्या मनात फिरूनी येण्याविषयी ओढ हवी।
ऐसा प्रेमळ माणुसकीचा झरा वहावा मनामधे॥१॥

भांड्याला लागतेच भांडे विसरूनी जावे क्षणामधे।
परस्परांना समजून घ्यो आढी नसावी मनामधे।
रूसवे फुगवे नको फुकाचे मोद रहावा मनामधे॥२॥

नित्य कालजी घरात घ्यावी वय झालेल्या पानांची।
ज्याची त्याला द्यावी जागा वयाप्रमाणे मानाची।
एकमताने निर्णय घ्यावा नको दुरावा मनामधे॥३॥

लळा जिव्हाळा आत असावा नको उमाळा वरकरणी।
नको घराला गर्व धनाचा लीन रहावे प्रभुचरणी।
दिवसा राती परमेशाचा वास असावा घरामधे॥४॥

# परमेश्वराशिवाय धन व्यर्थ असते

*'चित्ती असो द्यावे समाधान', हे समाधान हरवल्यामुळे माणसाची आजची अवस्था हरवलेल्या मुलाप्रमाणे झाली आहे - संपादक*

मूल रडत असताना ते रडू नये म्हणून आई ज्याप्रमाणे त्याच्यासमोर अनेक खेळणी ठेवते, त्याचपमाणे परमेश्वराने, अनेक भौतिक वस्तू खेळण्यांच्या स्वरूपात आपल्या समोर ठेवल्या आहेत. एखाद्या वस्तूचा उपभोग घेतल्यानंतर तिचे आकर्षण कमी होऊन दुसरी वस्तू हवी हवीशी वाटते हे आकर्षण किंवा मोह एवढा वाईट आहे की, माणसाला तो केव्हाही सुखी होऊ देत नाही. दु:खाचे मूळ कारण म्हणजेच वस्तूचा मोह होय. आणि आपण सर्वजण या साधनसंपत्तीमध्ये एवढे गुंतलो आहोत की त्यांच्या उपभोगातच सर्व आनंद मिळवण्याचा प्रयत्न करीत आहोत. खरा आनंद परमेश्वराच्या जवळ जाण्यात आहे, त्याच्यापुढे नतमस्तक होण्यात आहे. हेच नेमके आपण विसरतो.

कोणत्याही वस्तूचा उपभोग ठरावीक काळासाठीच घेता येतो. पुन्हा-पुन्हा नाही. या पृथ्वीवरील कोणतीही वस्तू चिरकाळ टिकणारी नाही. प्रत्येक वस्तूचा नाश हा अटळ आहे. ज्या ठिकाणी पूर्वी ईमारत नव्हती तिथे आज ती दिसते आहे. परंतु पुढे काही काळानंतर त्या ठिकाणी ती नसणार. पूर्वी जेथे झाड नव्हते तेथे आज दिसते आहे. परंतु काही वर्षांनतर ते झाड त्या ठिकाणी नसणार आहे. या ठिकाणी आपल्या घरामधील कोणतीही वस्तू घ्या, ती चिरकाळ टिकणारी नाही. केव्हातरी ती खराब होईल आणि ती वापरातून काढून टाकली जाईल. आपल्या एक गोष्ट लक्षात येईल ती म्हणजे या पृथ्वीवर जे-जे आपल्या दृष्टीस पडते किंवा दिसते ते सर्व नाशवंत आहे. आज आहे, परंतु काही काळानंतर ते नसणार आहे. पण जे-जे आपणास दिसत नाही ते मात्र सर्व सत्य आहे. उदा. ऊस दिसतो पण त्यामध्ये असणारा रस दिसत नाही, आंबा दिसतो पण त्या आंब्यामधील रस दिसत नाही, फूल दिसते, पण फुलाचा सुगंध दिसत नाही, जमीन दिसते पण त्याच्या खालचे पाणी दिसत नाही, हवा दिसत नाही पण तिचा अनुभव घेता येतो. म्हणजेच जे डोळ्यांना दिसते ते असत्य असते पण जे डोळ्यांना दिसत नाही तेच खरे सत्य असते. तसेच परमेश्वराचे आहे. परमेश्वर दिसत नाही, पण त्याचा अनुभव घेता येतो. परमेश्वराशिवाय सर्व वस्तू निरर्थक आहेत. मूल रडत असताना आई त्यास अनेक खेळणी देते पण त्या मुलाला खरा आनंद केंव्हा मिळतो तर आईच्या मांडीवर गेल्यानंतरच. परमेश्वराचेही तसेच आहे. त्याच्याजवळ जाऊन त्याच्या पायावर डोके ठेवल्यानंतरच आपणास खरे समाधान मिळते. परमेश्वराशिवाय सर्व वस्तू कशा निरर्थक आहेत हे पुढील उदाहरणाच्या सहाय्याने अधिक स्पष्ट करता येईल.

आई आपल्या मुलाला जत्रेत घेऊन जाते. त्या जत्रेमध्ये अनेक आकर्षक वस्तू असतात. त्या वस्तू पाहुन तो मुलगा आपल्या आईकडे वस्तूसाठी आग्रह करतो त्याची आई म्हणते, पुढे चल, या पेक्षा चांगली खेळणी तुला घेऊन देते. असे अनेक वेळा घडते. शेवटी त्या मुलास मोह आवरेना. आपल्याला या वस्तू हव्यातच असे वाटू लागले. तो लहान मुलगा आईचा हात सोडून एका खेळण्याच्या दुकानात केव्हा गेला हे त्यांच्या आईला कळतही नाही. नंतर आई त्या लहान मुलाचा खूप शोध घेते पण तो मुलगा तिला सापडतच नाही. ज्या खेळण्याच्या दुकानात तो लहान मुलगा गेला होता त्याच दुकानात इतरही लोक खेळणी

घेण्यासाठी आले होते. लहान मुलगा हरवला असल्याचे त्याच्या हालचालीवरून तेथील लोकांच्या लक्षात आले. त्या वेळी तेथील एका व्यक्तीने त्या लहान मुलास जवळ घेऊन विचारले, मुला तुझ्या आईचे नाव काय? तो सांगतो माझ्या आईचे नाव आई आहे. कारण त्याला त्याच्या आईचे नाव माहीत नव्हते त्यानंतर त्या व्यक्तीने तुझ्या बाबांचे नाव काय? असे विचारले असता तो मुलगा बाबांचे नाव बाबा सांगतो. कारण त्यास बाबांचे नावही माहीत नसते.

शेवटी त्या मुलास काहीतरी आवडती वस्तू देऊन आपण त्याची सर्व माहिती विचारावी म्हणून त्या व्यक्तीने खेळण्याच्या वस्तू देण्याचा प्रयत्न केला. पण मुलगा एकही वस्तू घेईना. पूर्वी ज्या वस्तू आईकडे मागण्याचा आग्रह धरत होता त्या वस्तूही तो घेत नव्हता. कारण आता हवी होती फक्त त्याची 'आई.' आई सोबत असताना त्याने अनेक खेळणी मागण्याचा आग्रह धरला होता. पण आई शिवाय त्याला अनेक खेळणी दिली तरी, तो मुलगा त्याचा स्वीकार करीत नव्हता.

**तात्पर्य :** आईशिवाय तो मुलगा कोणत्याही वस्तूला किंमत देत नव्हता, त्या वस्तूंचा स्वीकार करीत नव्हता. तसेच प्रत्येक व्यक्तीने परमेश्वराशिवाय या संसारातील सर्व वस्तू निरुपयोगी समजाव्यात. आणि परमेश्वर प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करावा. ज्या वस्तू परमेश्वर आपणास देईल त्यांचाच स्वीकार करावा. त्या मध्येच समाधान मानावे. परंतु कोणत्याही वस्तूबद्दल आसक्ती दाखवू नये.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३,
सुभाष रोड, कुंभारखान पाडा,
डोंबिवली (प.), जि. ठाणे

●●●

## विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

### विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्राथमिक विभाग)
२) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)
३) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (प्राथमिक विभाग)
४) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (माध्यमिक विभाग)
५) के. ग. जोशी कला महाविद्यालय व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय
६) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय
७) वि. प्र. मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय
८) डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था
९) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन
१०) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन माहिती तंत्रज्ञान केंद्र
११) वि. प्र. मंडळाचे प्रगत अभ्यास केंद्र

थोर पुरुषांच्या चरित्रावरून त्यांच्या थोरपणाचे रहस्य त्यांच्या ग्रंथ वाचनात असल्याचे लक्षात येते.

# भारतीय नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

## स्वागत यात्रा

**चैत्र शु. प्रतिपदा, शके १९३०**
**रविवार, दि. ६ एप्रिल २००८**

*नववर्षाचे आगमन नुकतेच झाले. २००८ च्या नववर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने वि.प्र. मंडळाचे कार्यवाह मा. श्री. अुत्तम जोशी यांनी लिहिलेल्या नांदीची संहिता येथे मुद्दाम देत आहोत. दिशाच्या वाचकांपर्यंत ती पोहोचावी व त्यांच्या वाचनात यावी हा यामागे हेतू आहे. या नांदीबरोबरच २००९ साली त्यांनी केलेली रचनाही देत आहोत - संपादक*

### ।। नांदी ।।

नमितो आधी कौपीनेश्वरा
मग भावे सारस्वतकारा ।।

दशाननाचा नाश करोनी
अयोध्येच्या पावन नगरी
आले रघुवर याच दिनाला ।।

गुढ्या, तोरणे रांगोळ्यांनी
सजवून सारी, भुवने आणी,
जमुनी सारे नटुनी थटुनी
पद पथांवर करू स्वागता ।।

महाजनांची स्मरूनी नामे,
प्रभात समयी मंगल स्नाने
माधव अच्युत अग्रस्थाना।।

साष्टीमध्ये बहुजन वसले
समष्टीला समृद्ध कराया,
आठव त्यांचे कितीक सांगू
पावन श्री स्थानकी या।।

बंधूद्वय चाफेकर ते
कारागृही या फाशी गेले





**लेखक - श्री. अुत्तम जोशी**

अश्रुनयनी मुळी न आले
मातृभूमीच्या आले कामा।।

रंगभूमी समृद्ध कराया
नटही कितीतरी इथेच घडले
राम गायने मधुर करोनी
अजरामर झाला ।।

वीणा वादिनी सरस्वती ही
सदैव वसते ज्ञानद्वीपी
तिला विनविण्या वासुदेव हा
रात्रं दिन झटला।।

श्रमदानाने मार्ग शिवाचा
दिला घालूनी देसायांनी
सावळ्याच्या कवनाने तर
कळसचि हो चढविला
घंटाळीच्या आशिर्वचने
मित्र मंडळा घेवून संगे
योगायोगे श्री कृष्णाने
योग की हो साधला

त्यागुनी पक्ष भेद हा सारा
सकल वंदिती भावे तुजला

अुत्तम आशिर्वच दे सकळा
भक्तजनांच्या वर्षावाने
शंकर मठ हा तृप्त असावा॥

दुरितांचे हे तिमीर जाऊ दे
'मामा' आम्हा सांगुन गेले
सुहास वदने रंगभूमीला
प्रणाम करी सारस्वत हा॥

**नटी** - अहोऽ अहोऽ अहोऽ एवढे कोठे घाईघाईने निघालात? आणि हे हो काय, सर्व बाजूंना गुढ्या तोरणे रांगोळ्या आणि छान छान पारंपरिक वेषात सर्व नागरिक निघाले तरी कोठे? सांगा ना हो गडे!

**सूत्रधार** - अगो, जरा धीर तर धरशील!

**नटी** - मला मेलीला कुठला धीर निघायला? पण मला सांगा आज आपण जी नांदी सादर केली ती आपल्या जुन्या संगीत नाटकापेक्षा वेगळी होती ना हो?

**सूत्रधार** - आता कुठे तुला थोडे थोडे कळते असे म्हणावेसे वाटते. अगो वेगळी म्हणजे काय? वेगळीच आहे ती ! पण मला सांग आज दिवस कोणता आहे?

**नटी** - अंऽऽहो! आज आहे गुढीपाडवा!

**सूत्रधार** - अगदी बरोबर आजच प्रभू श्रीरामचंद्रानी रावणाचा वध केला आणि सीतेला सन्मानाने आणून आयोध्येत प्रवेश केला.

**नटी** - हो, हे बाकी बरोबर आहे हं ! पऽऽण काहो नांदीमध्ये आपण फक्त नटेश्वर, गणपती अशा देव देवतांची नावे घेत असतो. मग या नांदीत तऽऽर

**सूत्रधार** - अग होऽ होऽ हो किती बोलशील एकदम?

या नांदीमध्ये की नाही ठाण्यामध्ये जी काही थोर मंडळी होऊन गेली, त्यांचा व सध्या जी मंडळी आघाडीवर आहेत अशांचा उल्लेख आला आहे. त्याबद्दल आपण सर्वांना थोडक्यात माहिती देणार आहोत.

**नटी** - अगदी बरोबर पहिला उल्लेख आहे तो चापेकर बंधूंचा ...

१८९७ च्या सुमारास पुण्यामध्ये आलेल्या प्लेगच्या साथीचा प्रतिबंध करण्यासाठी मि. रॅण्ड याची नियुक्ती झाली. तो अत्यंत भारतव्देष्टा होता. त्याने पुण्यातील जनतेवर अमानुष अत्याचार केले. गोऱ्या सोल्जर्सना भारतीयांची अनेक प्रकारे पिळवणूक करण्याची आणि त्यांच्यावर अतोनात जुलूम करण्याची आज्ञा दिली.

मि. रॅण्डला प्रतिकार करणे म्हणजे त्याचा अंत करणे असे चापेकर बंधूंना मनोमन वाटत होते.

त्याप्रमाणे त्यांनी व त्यांच्या साथीदारांनी २२ जून १८९७ रोजी रॅण्डचा आणि आयर्स्टचा वध केला. खुन्यांना पकडण्यासाठी ब्रिटिश सरकारने वीस हजार रुपयांचे घसघशीत आमिष दाखवले.

...आणि फितुरी झाली ...द्रविड बंधुंनी आपले इमान विकले आणि देशद्रोह केला. झाले! व्हायचे तेच झाले! दामोदर पंत व त्यांचे बंधू पकडले गेले आणि १८ एप्रिल १८९८ रोजी ठाण्यातील कारागृहामध्ये त्यांना फासावर लटकवण्यात आले. पुढे वासुदेव चापेकरांनी द्रविड बंधूंना ठार मारून फितुरीचा सूड घेतला आणि त्यांनाही ८ मे १८९९ ला ठाण्याच्याच कारागृह फाशी दिली.

त्यांचे बलिदान म्हणजे स्वातंत्र्याच्या सशस्त्र क्रांतीचे स्फूर्तिस्थान ठरले.

**✦ मामा पेंडसे :**

मामा पेंडसे हे मराठी रंगभूमीवरील एक भारदस्त नाव. त्यांनी आपल्या ८० वर्षाच्या प्रदीर्घ आयुष्यामध्ये एकोणपन्नास भूमिका गाजवल्या. आपल्या दर्जेदार

अभिनयाने अक्षरशः अविस्मरणीय केल्या.

'आग्र्याहून सुटका' मधला उमरखान, 'बेबंद शाही' मधला खंडोजी.


'पंडितराज जगन्नाथ' मधला शहाजहान तर 'दुरितांचे तिमिर जावे' मधले पंत अशा त्यांच्या कितीतरी भूमिका गाजल्या.

'नाना फडणीस' हे केवळ नाव उच्चारले तरी मामांचाच नाना फडणीस डोळ्यांसमोर उभा रहातो. मामांनी काही चित्रपटांमध्येही भूमिका केल्या.

आखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्षपद भूषविलेल्या मामांनी अनेक मानसन्मान मिळवले.

दिल्लीच्या संगीत ॲकॅडमीने सुद्धा ताम्रपट देऊन त्यांचा गौरव केला. अशा या थोर कलावंताचा सहवास ठाणेकरांना अनेक वर्षे लाभावा हे ठाणेकरांचे सद्‌भाग्यच.

**✦ जनकवी पी. सावळाराम :**



**जनकवी पी. सावळाराम**

पी. सावळाराम हे नाव त्यांच्या रसपूर्ण आणि भावगर्भ गीतांच्याद्वारा महाराष्ट्रातील घरांपर्यंतच नव्हे तर स्वयंपाक-घरापर्यंत पोहचले आहे. खानदानी दिवाणखान्यांपासून गोरगरिबांच्या ओटी ओसरीपर्यंत या नावाचा संचार झाला आहे.

भावगीत, भक्तिगीत, चित्रपट गीत या सर्वच क्षेत्रांत यशस्वी वाटचाल करणाऱ्या कवीला 'जनकवी' ही पदवी मिळली आहे.

लता मंगेशकर, आशा भोसले यांसारख्या गायिकांच्या अमृततुल्य स्वरांचा लाभ त्यांच्या गीतांना लाभला. त्यांनी महाराष्ट्रातून अगणित रसिकांना कारुण्यापासून वत्सल, भक्ती व शृंगारापर्यंत अनेक रसांचा अुत्कट आणि आल्हाददायक अनुभव दिला. 'गंगा-जमुना ' हे गीत ऐकताना ज्याचे अंतःकरण भरून आले नाही आणि पापण्या ओलावल्या नाहीत असा श्रोता शोधूनही सापडणार नाही. अशा या महान कवीचे पूर्ण आयुष्य ठाण्यामध्येच व्यतीत झाले हे ठाणेकरांचे सद्‌भाग्यच. १९६६-६७ या काळात ते ठाण्याचे नगराध्यक्ष होते. एक कवी नगराध्यक्ष होऊ शकतो याबद्दल आचार्य अत्र्यांना अत्यानंद झाला. त्यांनी त्यांचे खूप कौतुक केले होते. अशा या कवी असलेल्या नगराध्यक्षाला मानाचा मुजरा.

**✦ श्री. वि. ल. भावे :**

मराठीतील ख्यातनाम साहित्य संशोधक आणि 'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथाचे ग्रंथकार श्री. वि. ल. भावे यांनी बालपणापासूनचे सर्व आयुष्य ठाण्यात व्यतीत केले.

मूळचे श्रीवर्धनचे असलेले भावे हे शिक्षणासाठी ठाण्यात आले व ठाण्यात स्थायिक झाले. त्यांचे पक्षी विषयक ज्ञान किती होते याची जाणीव त्यांनी लिहिलेल्या 'पाखरांचा परिचय' हे पुस्तक वाचल्यावर साहजिकच होते. महाविद्यालयीन शिक्षण चालू असतानाच 'महाराष्ट्र सारस्वत' च्या पहिल्या आवृत्तीचे लेखन केले होते. त्या सुमारास त्यांनी देशातील पहिले मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे येथे स्थापन केले.


मराठी भाषेतील ग्रंथ सूचीचा पहिला प्रयोग भावे

यांनीच केला. 'चक्रवर्ती नेपोलियन' हा चरित्र ग्रंथ त्यांनी लिहिला.

'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथात मराठी साहित्याच्या प्रारंभ काळापासून १८१८ पर्यंतच्या साहित्याचा परामर्श त्यांनी घेतला आहे.

महानुभाव, संत, पंडित आणि शाहीर कवींच्या काव्यरचनेचा मागोवा घेऊन त्यांनी हा ग्रंथ संपादित केला. प्राचीन मराठी साहित्याच्या इतिहासावरील महत्त्वपूर्ण संदर्भ ग्रंथ म्हणून या ग्रंथाला मान्यता मिळाली आहे. या ग्रंथातून त्यांची अध्ययनशीलता, मराठीवरील निस्सीम प्रेम आणि अविचल निष्ठा, रसिकता आणि भाषाप्रभुत्व या गुणांचे दर्शन घडते. अशा या साहित्य रसिकाला शतशः प्रणाम.

**✧ संगीत भूषण पं. राम मराठे :**




**संगीत भूषण पं. राम मराठे**

संगीतातील नादब्रह्माची अनुभूती देणारा हा मनस्वी कलाकार.

ग्वाल्हेरचे पं. मनोहर बर्वे, पं. मिराशी बुवा, मास्टर कृष्णराव(फुलंब्रीकर), जयपूरचे वामनराव सडोलीकर, आग्रा घराण्याचे विलायत हुसेन खां आणि पंडित जगन्नाथ बुवा पुरोहित या सारख्या दिग्गजांकडे पं. राम मराठे यांनी शास्त्रीय संगीताचे धडे गिरवले आणि ग्वाल्हेर, जालंदर, पाटणा, कलकत्ता, दिल्ली व अमृतसर येथील शास्त्रीय संगीत संमेलने गाजवून सोडली.

संगीतातील प्रगतीमुळे त्यांनी संगीत रंगभूमीवर पदार्पण केले. स्वयंवर, सौभद्र, संशयकल्लोळ, मानापमान, मंदारमाला, जयजय गौरीशंकर, एकच प्याला या नाटकांमधील त्यांच्या भूमिका अनेक वर्षे रसिकांच्या मनात रेंगाळत राहिल्या आहेत. १९७३ साली बालगंधर्व महोत्सवामध्ये त्यांना सुवर्णपदक बहाल केले गेले. पुरीच्या जगद्गुरु शंकराचार्यांकडून 'संगीत चूडामणी' ही पदवी त्यांना प्राप्त झाली. आजच्या बदलत्या अभिरुचीच्या काळातसुद्धा अवीट गोडीच्या संगीतामुळे राम मराठे हे नाव आजही रसिकांच्या मनात टिकून आहे.

**✧ शिक्षण महर्षी डॉक्टर वा. ना. बेडेकर :**



**डॉक्टर वा. ना. बेडेकर**

<u>डॉ. वा. ना. बेडेकर यांना ओळखत नाही असा माणूस ठाण्यात शोधूनही मिळणार नाही.</u>

स्वतःच्या शिक्षणासाठी आपल्या राहत्या गावापासून, राजापूरहून दूर जावे लागले ही खंत डॉक्टरांना मनात नेहमी सलत असे. म्हणून ठाणे येथे प्रॅक्टिस सुरु केल्यानंतर प्रथम

त्यांनी शिक्षण क्षेत्रातच कामाला सुरुवात केली. त्या कामाचा पसारा आज किती मोठा झाला आहे ते आपण सर्वजण पहात आहोतच. सुरुवातीला नौपाडा येथे एका गोठ्यात भरणारी शाळा ती हीच काय? असे आजची शाळेची इमारत पाहिल्यावर वाटते. पण या गोष्टी काय जादूसारख्या एकदम थोड्याच झाल्या आहेत?

या सर्व कार्यासाठी त्यांना पी. सावळाराम यांनी बाळासाहेब देसाईंकडून १३ एकर जागा मिळवून दिली. आर. के. गोखले, गुणाकर जोशी, मा. ना. पाटील, टिल्लू सर, चिटणीस सर यांच्यासारखे अनेक कार्यकर्ते लाभले म्हणूनच ही गोष्ट साध्य झाली.


हो! ते बाकी खरे हो! कोणतेही मोठे काम उभारायचे म्हटले की एक विचाराने काम करणारी मंडळी एकत्र आल्याशिवाय ते होऊच शकणार नाही.

आता तर डॉक्टर साहेबांच्या कामाचा पसारा इतका वाढला आहे की पाच महाविद्यालये व दोन शाळा मिळून सुमारे पंधरा हजार विद्यार्थी या ज्ञानद्वीपावर शिक्षण घेत आहेत. ही सर्व धुरा डॉ. बेडेकरांनंतर त्यांचे चिरंजीव डॉ. विजय बेडेकर हे अत्यंत यशस्वीपणे सांभाळत आहेत.

आणि बरं का ! १९७९ साली डॉक्टरसाहेबांनी अन्य सहकाऱ्यांना बरोबर घेऊन 'ठाणे भारत सहकारी बँकेची' स्थापना केली. ती बँक आज शेड्यूल्ड बँक म्हणून नावारूपाला येऊन सुमारे १००० कोटींचा व्यवसाय करीत आहे. सध्या या बँकेचे धुरिणत्व डॉक्टरांचे सहकारी मा. य. गोखले हे सांभाळीत आहेत.

**✦ श्री. अण्णासाहेब व्यवहारे :**

श्रीकृष्ण आणि योग या शब्दांचे नाते इतके अतूट आहे की योगाचार्य ही पदवी खडतर साधनेने मिळवून योगाचा प्रचार करण्याचा मान श्रीकृष्ण व्यवहारे या व्यक्तीलाच मिळाला.



**श्री. अण्णासाहेब व्यवहारे**

सुमारे चाळीस वर्षांपूर्वी योगाचार्य का. बा. सहस्रबुद्धे यांच्यापासून प्रेरणा घेऊन आपल्या घंटाळी मित्र मंडळाच्या माध्यमातून व्यवहाऱ्यांनी योगाचे बाबतीत ठाण्याचे नाव फक्त महाराष्ट्रातच नाही, तर महाराष्ट्राबाहेर व परदेशातही गाजवले आहे. अत्यंत निरलसपणे योगसेवा करीत रहाणे व सर्वांना सतत बरोबर घेऊन जाणे हे अण्णांचे गुण निश्चितच वाखाणण्यासारखे आहेत.

**✦ श्री. देसाई -**

५६ - ५७ च्या सुमारास ठाणे शहराचा पुढे होणारा विकास लक्षात घेऊन कौपीनेश्वर मंदिराच्या मागून अग्यारीलेन ते प्रभात सिनेमा व स्टेशनपर्यंतचा रस्ता आपल्या मुख्याधिकारी पदाच्या कारकीर्दीत श्री. देसाई यांनी ठाणेकरांच्या श्रमदानातून उभा केला आहे. याची जाणीव फार थोड्या नागरीकांना असेल.

चित्ररथ 'नांदी'

***अनमोल सहकार्य व मार्गदर्शन - श्रेय नामावली***

**मूळ संकल्पना, लेखन व नांदी (गीत) :**
श्री. उत्तम भा. जोशी
उपाध्यक्ष, ठाणे भारत सहकारी बँक लि.

**संगीत :** श्री. विनयजी राजवाडे,

**संगीत संयोजन व ऑर्गन :** श्री. आदित्य ओक

**वादक :** धनंजय पुराणिक, ऋषिराज साळवी, गौतम नाईक, सागर टेमघरे आणि व्हायोलिन महेश खानोलकर

**गायक कलाकार :** मुकुंद मराठे, अनिरुद्ध जोशी, विनय राजवाडे, वेदश्री ओक, कल्याणी जोशी, अपूर्वा गोखले, वरदा गोडबोले प्रशांत काळुंद्रेकर, सचिन मोहिते, जयश्री करंबेळकर, प्रिया निमकर, प्रीती निमकर, शर्वरी जोशी, आदिती जोशी आणि पं. सुरेश बापट

**ध्वनिमुद्रण :** डीजिटल स्टुडिओ, ठाणे - श्री. चैतन्य देशमुख अक्षय डीजिटल स्टुडिओ, ठाणे - श्री. प्रफुल्ल आठवले

### चित्ररथावरील कलाकार

दिग्दर्शक - श्री. नितीन पटवर्धन

सहाय्यक - श्री. शिवाजी साळुंखे

कलाकार - नितीन पटवर्धन, सचिन सरदेसाई, झेलम सोनार, प्रसाद दांडेकर, संध्या गोडसे, प्रसाद देवधर, विलास महाडिक, प्राजक्ता राणे, सौरभ परांजपे, प्रसाद भट, हरिश गांगल, विशाल मेटे, नितीन भोईर, ज्योती दळवी, आदिती गुप्ते आणि यश दांडेकर

मिक्सींग आणि मास्टरिंग आजिवासन स्टुडिओ, मुंबई - श्री. विनायक दाबके

### ✦ मार्गदर्शन :

श्री. दिलीप पतकी
(सरव्यवस्थापक व मुख्यकार्यकारी अधिकारी)

श्री. अमोल मांदुस्कर
(सहाय्यक सरव्यवस्थापक) ठाणे भारत सहकारी बँक लि.

●●●

---

## भारतीय नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

## स्वागत यात्रा

**चैत्र शु. प्रतिपदा, शके १९३०**
**रविवार, दि. ६ एप्रिल २००८**

### ।। पोवाडा ।।

१) सतराशे सत्तावन्न साली - २
प्लासीची लढाई (की हो झाली) - २
मोंगल राजांची दाणादाण झाली
इस्ट इंडिया कंपनीची सत्ता की हो आली -जी

२) संस्थाने खासला केली - २
तैनाती फौज उभी केली
मग्रुर आणि उद्धट वर्तणुक केली
असंतोषाशी आग की हो भडकली जी

गद्य ३) कोणीही अिग्रंजासमोर हिंदु घोडे स्वार आला तर त्याने पाअी अुतरुन चालत गेले पाहिजे अितकी बंधने आली.

४) विहिरीत पाव टाकून - २
कधी जोर जबरदस्तीनं - २

---

धर्मांतर आणिली घडवून या हिंदुस्थानातून
जनतेचा राग घेतला ओढवुन जी जी

गद्य ५) हिंदुस्थानात धर्मनिष्ठा ही नेहमीच प्रभावी असल्यामुळे
जनतेने बंड आणि अुठावाच्या माध्यमातून इंग्रजांच्या विरुद्धचा राग प्रगट करण्यास सुरुवात केली.

६) बंगाल प्रदेशामध्ये संन्याशांचे ते बंड
बिहार प्रदेशामध्ये झाला चौर विद्रोह
सतराशे नव्वदचा तामीळनाडचा अुठाव
दिडीगळमध्ये झाला हो घनघोर जनसंघर्ष
विजयापट्टणी संघर्ष
त्रावणकोरी विद्रोह
अशा कितीक घटना सांगू र जी जी

गद्य ७) गुजराथमध्ये कोळ्यांनी १८२४ ते ४९ पर्यंत सुमारे चारवेळा सशस्त्र उठाव केले. १८१६ ते ३२ पर्यंत सौराष्ट्रातील मोठ्या जमीनदारांचे उठाव होतच होते.

गद्य ८) आणि अशा या वातावरणात महाराष्ट्र मागे राहील का? मुळीच नाही. महाराष्ट्रामध्ये तर बंडखोरीची भावना धगधगतच होती.

९) कीत्तुरचा अुठाव झाला
उद्रेक कोल्हापूराला
१८४१ला झाले बंड साताऱ्याला
जबलपूरमधे बुंदेले तिथे त्याने बंड केले
बुंदेले शूर ते मोठे त्यांनी दंड थोपटले
राणीच्या सत्ते विरोधात की हो जी जी

१०) नानासाहेबांनी दूत धाडिले
पार उत्तर दक्षिणी गेले
फौजेतील शिपायांना हो चतुराईने फितवले
रंगोबापुजी अति हुशार
युद्धाचा करिती प्रचार
सांकेतीक भाषेतुन
देती संदेश धाडून-शिलेदार प्रखर
राष्ट्राभिमानाचे हो जी जी

११) मौलवी आणि पंडित फकिर ते इंग्रजीघर
गाडी आणि पोलीस घेतले करुन सामिल
१८५७ साल मे चा दिन एकतीस
ठेवीली देशाची शान घेतला की हो ठरवून
क्रांती युद्धासाठी की हो जी जी

१२) मंगला पांडे शहीद की हो झाला
झाशी राणीने पराक्रम केला
पोरगं बांधलं कमरला
राणी गेली समराला
घोड फेकलं तिंनं किल्यावरुन जी जी जी

गद्य १३) ''फितुरीची कीड जर लागली नसती तर पण ते होणे नव्हते राणीला हार पत्करावी लागली.''

१४) केवळ एका जहागिरीसाठी मानसिंग
मिळाला इंग्रजांशी
देशाला फितूर तो झाला
ब्रिटिशांना दिले तात्याला
तात्यान आपल्या हातान
फास मानेभोवती आवळला
तात्या टोपे फाशी गेला र जी जी जी

गद्य १५) ''महाराष्ट्राचे आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके''.

१६) रामोशांचे सैन्य की हो केले
सरकारी खजिने अडविले
संपत्ती, शस्त्र जमविले,
सशस्त्र आंदोलन केले, अन झाल काय

अठराशे एकोनऐंशीच्या
जुलै तीन तारखेला
बंदी केले सरकारने
आणि पाठविले अेडनला
तो क्रांतिसूर्य बंदिवान झाला जी जी जी

१७) ते लाल, बाल अन पाल
भगतसिंग, चाफेकर, लोकमान्य अति जहाल
करिती लेखणी तलवार
सावरकर ते हुशार
झाले बोटीतुन फरार
असे हे कितीक क्रांतीकारक जी जी जी

१८) १९४७ साल
स्वातंत्र्य मिळे देशाला
जय जयकार फार हो केला
पण जपले नाही देशाला

१९) आपसात करुन भांडणे
मिळेल तेथून खीरापत खाणे
जनतेला धूळ चारणे
राष्ट्राचे काय हो देणे? जी जी जी

२०) ज्यांचे जीव जाती नाहक
असे कितीक नागरिक
करकरे, कामठे, साळसकर जी जी जी

मागील वर्षाच्या उत्तरार्धात घडलेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याचे सवाट अजूनही कमी झालेले नाही व या पार्श्वभूमीवर आपण हा गुढीपाडवा साजरा करीत आहोत.

आजच्या दिवशी दि. २६/११ च्या हल्ल्यात बळी पडलेल्या सर्वांना प्रथम प्रणाम करून दहशतवाद विरोधात करावयाच्या लढ्यासाठी सिद्ध होण्याची शपथ घेऊ या आणि दहशतवादाचा हा राक्षस कायमचा गाडून टाकण्याची शक्ती आपल्याला मिळो, अशी श्रीकौपीनेश्वर महाराजांपुढे प्रार्थना करू या.

हर हर महादेव!
कौपिनेश्वर महाराजकी जय!

प्रथम वंदूया मांदार गणेशाला
दुसरे वंदन स्फटिकाच्या मारुतीरायाला

किल्ल्या मधला हनुमान अन अुद्यान गणेशाला
पुढले वंदन सायन्नाच्या दत्तात्रय मूर्तीला
वेशीवरल्या राजेश्वर महादेवाला
पेठ्या मारूती अन बजरंगबल तो पिंपळपाड्याला
करूया वंदन गांवदेवीला अन
घंटाळीच्या जागृत मातेला
गायमुखच्या डोंगरावरी महादेव बसले
विद्यापीठात तत्त्वज्ञानी श्रीकृष्ण दिसले
बुद्धी द्यावी शक्ती मिळावी अशी
विनंती कौपिनेश्वराला

प्रथम वंदूया मांदार गणेशाला
श्री स्थानक हे आमुचे ठाणे
देवदिकांची कितीक स्थाने
तलाव सुंदर आणि अुद्याने
सुमती द्यावी सकळ जनांना
प्रथम वंदुया मांदार गणेशाला

**दहशतवाद! दहशतवाद! दहशतवाद! :**

असे नुसते घोकून तो संपणार आहे का?

नाही, मग तो जर संपूर्ण नष्ट करायचाच असेल तर आधी त्याची पार्श्वभूमी विचारात घेणे अत्यंत गरजेचे आहे.

हा दहशतवाद काय एकदम अुफाळला का?

तर नाही, असे म्हणावे लागेल.

मुळात दहशतवादाचे अनेक प्रकार आहेत. यातील

धार्मिक दहशतवाद हा अति पुरातन आहे व हा दहशतवाद फक्त हिंसेच्याच मार्गाने जात असतो.

हजारो मंदिरे उध्वस्त करत आणि लाखो लोकांना सक्तीने बाटवत परकीय भारतामध्ये नवव्या शतकात आला.

रामजन्मभूमी मंदिर तोडून बाबरी मशिद बसविली गेली असा आरोप आहेच. आणि अशा प्रकारच्या दहशतीनेच सुमारे ५०० वर्षे लढून परकीयांनी या खंडप्राय देशामध्ये पाय रोवले व आपली सत्ता विस्तारित करण्यास सुरुवात केली. सर्वच संस्थानिक इस्लामला शरण गेले, पण अेकच शिवाजी महाराज जन्माला आले आणि त्यांनी परकीयांच्या विरोधात झगडा देऊन हिंदवी राज्याची स्थापना केली.

पुढे ब्रिटिश सत्ता आली आणि त्यांनी भारताचे ख्रिस्तीकरण्यास सुरुवात केली. अनेक चर्चेस बांधली आणि अिंग्लंडच्या राणीची महासत्ता येथे राज्य करू लागली.

१७५७ च्या प्लासीच्या लढाईत विजय मिळविल्यानंतर इस्ट इंडिया कंपनीला येथे पाय रोवण्यात यश मिळाले आणि मग त्यांनी सर्व प्रकारे सत्ता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले.

तैनाती फौजेच्या पद्धतीचा हुशारीने उपयोग करून राजांना शरण यायला लावले व वेगवेगळ्या कारणास्तव सबबी सांगत बरीच राज्ये खालसा केली व १८४८ पर्यंत या खंडप्राय देशावर राजकीय प्रभुत्व प्रस्थापित केले.

**''भारत माता की जय'' :**

या भारतभूमीने आजपर्यंत अनेक वीरांना जन्म दिला. अनेक लढाया पाहिल्या पण १८५७ चे स्वातंत्र्य युद्ध जवळ जवळ ९० वर्षे चालू होते.

आपल्या सामर्थ्यवान अशा नाविक दलाचा उपयोग इंग्रजांनी केला व १७५७ च्या प्लासीच्या लढाअीत विजय मिळाल्यानंतर त्यांनी येथे सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. मोंगल जसजसे कमकुवत होऊ लागले तसे इंग्रजांचे फावले आणि वेगवेगळ्या राजांमधील दुहीचा फायदा घेतला. तैनाती फौजांचा वापर करून राजांना शरण यायला लावले व त्यांची राज्ये खालसा केली.

वेगवेगळ्या राज्यांमध्ये विखुरलेल्या या खंडप्राय देशावर आपले राजकीय प्रभुत्व प्रस्थापित करण्याचा हेतू सफल झाला.

कंपनीच्या अमलाखाली लोकांची जीवनस्थिती खालावली. जमीनदार व सुशिक्षित वर्ग कंगाल झाला. येथील सर्व प्रकारचे व्यापार, उद्योग, ग्रामीण व्यवसाय व हस्त व्यवसायांचा विध्वंस करण्यात आला.

आयुर्वेद व युनानी वैद्यक व्यवसायावर बंदी आली. लोकांना जबरदस्तीने ख्रिश्चन धर्माची दिक्षा देण्यात येअु लागली. आणि या सर्वांचा परिणाम म्हणजे इंग्रजांविषयीचा असंतोष उफाळून येऊ लागला. सर्वांच्या मनात धुमसत असलेल्या असंतोषाचा उद्रेक निरनिराळ्या मार्गाने प्रगट होऊ लागला व अनेक राज्यांमध्ये बंड व उठाव होऊ लागले.

बंगालमधील संन्याशांचे बंड, ओरिसामधील जमीनदारांचे बंड, विजयनगरच्या राजांचे बंड, तामिळनाडूमधील व म्हैसूरमधील अुठाव, विजगापट्टम् मधील संघर्ष, गुजराथ मधील कोळ्यांचे बंड, विलासपूरच्या राजपुतांचा अुठाव, अलिगडच्या तालुकेदारांचा संघर्ष, जबलपुरच्या बुंदेलांचे बंड हे सर्व प्रकार स्थानिक स्वरूपाचे व असंघटित होते.

मग यामध्ये महाराष्ट्र जरासुद्धा मागे नव्हता. कीत्तुरचा उठाव, कोल्हापूरचा उद्रेक, सातारचे बंड, गडकऱ्यांचा उठाव या साऱ्या प्रकारांचा परमोच्च बिंदु म्हणजे १८५७ चे पहिले स्वातंत्र्य युद्ध.

१८५६ च्या सुमारास नाना साहेबांनी आपले खास

दूत दिल्ली ते म्हैसुर पर्यंतच्या राजांकडे पाठविले. दक्षिण हिंदुस्थानात साताऱ्याहून रंगोबापुजी हुशारीने राजांमध्ये व जनतेमध्ये युद्ध प्रचाराचे काम करीत होते.

युरोपला प्रचारासाठी गेलेले अझीमुल्लाखान परत आले आणि त्यांनी नानासाहेब व अन्य पुढाऱ्यांशी युद्धाच्या योजनेबाबत बोलणी सुरू केली.

युद्धाचे केंद्रस्थान होते बिधुर. तेथूनच भूमिगतांमार्फत सूचना व आदेश दिल्ली, कलकत्ता, लखनऊ, सातारा येथे जाऊ लागले व ती उपकेंद्रे बनली. यांच्यात सांकेतिक पद्धतीने संपर्क केला जात असे. मौलवी, साधु, पंडित, फकीर वगैरे सर्वजण खेड्यापाड्यांमधून क्रांति युद्धाचा प्रचार करीत होते.

फडके जसे एडनला मरण पावले

तसे अनेक वीर या देशाच्या स्वातंत्र्यासाठी

लढले आणि त्यांना वीरमरण आले.

लाल, बाल, पाल, सावरकर, चाफेकर बंधू, भगतसिंग, सुखदेव, राजगुरु, खुदिराम बोस, म. गांधी असे अनेक क्रांतिकारक होऊन गेले. या देशाला स्वातंत्र्य मिळावे, ही इंग्रजांची सत्ता जावी म्हणून सर्वजण आपापल्या परीने लढले, कोणी फासावर गेले, कुणी तुरुंगात खितपत पडले, कुणाला वीर मरण आले, आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. भारत स्वतंत्र झाला. पण या मिळालेल्या स्वातंत्र्याचा आपण काय उपयोग केला?

शिवाजी महाराजांनी केलेल्या पराक्रमाने शिवशाही व पेशवाईचा काळ वगळता, सुमारे १००० वर्ष आपण कोणत्या ना कोणत्या दहशतीखालीच काढली, तरी हे राष्ट्र जिवंत राहिले. मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपयोग नि:स्वार्थीपणे करून राष्ट्राला भक्कम करण्याचे सोडून राज्य कोणी करावे याकरिता पक्षा-पक्षातील मारामारी आणि सुंदोपसुंदीमुळे ह्या देशाचे तीन तेरा वाजले आणि एका नवीन दहशतवादाने तोंड वर काढले. या सर्वाची फळे आपण भोगतो आहोत.

धर्म धर्म म्हणजे काय? तर त्या त्या काळातील गरजेनुसार धर्म तत्वांना मुरड घालून नवीन आणि सर्वांना लागू पडतील असे बदल घडवून नवी दिशा देतो तो धर्म आचारात आणला पाहिजे. केवळ जुन्या तत्वांना चिकटून राहाण्याने या युगात जगताच येणार नाही.

प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने वागले तर सरकारची आणि नेत्यांची काय हिंमत आहे? त्यांना जनतेला कधीच विसरता येणार नाही. जनतेचा क्षोम काय असतो व त्यामुळे काय होऊ शकते हे त्यांनाही पुरते ठाउुक आहे.

वेळीच बोध घेतला तर ठीक आहे. नाहीतर, संसदेवरील हल्ला, अक्षरधामवरील हल्ला आणि आत्ताचा २६/११ चा हल्ला असेच होत राहिले तर कांमठे, साळसकर, करकरे आणि शेकडो निरपराध नागरिक बळी जातील.

नुसत्या इशाऱ्याने जर धर्मांध माथेफिरूंच्या नेत्यांना ही गोष्ट समजत नसेल, तर नुसत्या वाटाघाटी न करता व कोणाही बलाढ्य राष्ट्राचा मुलाहिजा न ठेवता युद्ध करण्यासाठी जनता सरकारला भाग पाडील आणि सर्वप्रकारे साह्य करेल हे लक्षात ठेवा.

भारत माता की जय !

**श्री. अुत्तम जोशी**

कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

*दिशा संपर्क दूरध्वनी*

**२५४२६२७०**

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*भारतीय संस्कृतीचे अलौकिक व दिव्य वैशिष्ट्य जपणे का आवश्यक आहे ह्यावरचे हे विचार - संपादक*

**प्रास्ताविक :**

मार्च २००९ च्या दिशा मासिकात आपण संस्कृतीची वाटचाल कुठल्या तत्वांवर होते. याचा विचार केला. एखाद्या संस्कृतीचा पसारा व वृद्धी पाहिल्यावर तिच्या वैशिष्ट्यांचे मूळ बीज असे काही वेगळे असते काय? या विषयावर सुद्धा विचार केला. पण कोणते प्रश्न अनुत्तरित रहातात?

भारतीय संस्कृती, आपण जिला लौकिक अर्थाने मानतो, तिचे सध्याच्या काळात, जे बाह्य स्वरूप दिसते, त्यावरच त्या संस्कृतीची खरी ओळख होते कां? जगातील निरनिराळ्या मानवी संस्कृतीत कोणते मूलभूत फरक आहेत? ह्या अनेक मानवी संस्कृतीत संघर्ष कां झाले व आजही होत आहेत, असे प्रश्न पडतात, किंवा स्पष्ट बोलावयाचे झाले, तर असे प्रश्न पडावयाला हवेत!! पण, दुर्दैवाने ते प्रकर्षाने पडत नाहीत!!

त्याचे मुख्य कारण, मला वाटते ते कीं जीवनाच्या धकाधकींत दमलेला 'मानव समाज', अशा मूलभूत प्रश्नांच्या मागोवा घेण्यास लागणाऱ्या मन:स्थितीत नाही. जीवनातील प्रश्नांच्या क्रमांकात अशा प्रश्नाला शेवटच्या बाकावर बसवले जाते.

शिवाय, त्याच्या भौतिक १०० वर्षे ह्या ('अधिकतम) 'शरीर बध्द' आयुष्याच्या, 'अलीकडे' व 'पलीकडेही' **त्याला** 'जीवन' आहे. ह्या विश्वासाला, तो पारखा झाला आहे. कारण, **नाशिवंत शरीर हेच 'सत्य'** अशी ठाम समजूत त्याला मिळणाऱ्या **सामाजिक, राजकीय व आर्थिक जागतिक स्तरावरील चालणाऱ्या शिक्षण संस्थांनी, सत्ताधाऱ्यांनी व विचारवंतानी ठसविल्याकारणाने,** तो स्वतंत्र विचार करण्याच्या क्षमतेचा उरलेला नाही. **तो ह्या 'सेक्यूलर' व 'बुद्धीनिष्ठ' विचारवंतांवर डोळे बांधून 'अंध विश्वास' ठेवतो आहे.** एव्हढेंच नव्हे तर ह्या भौतिक विचारवंतांच्या सत्याच्या खात्री देणाऱ्या 'प्रमाणपद्धतीवर' पूर्ण व आंधळा विश्वास ठेवल्याने, त्यांनी 'भारतीय आध्यात्मिक (स्पिरीच्यूअल) संस्कृतीत जी सत्य ज्ञानाची प्रमाणे मांडली आहेत व आजही भारतीय हिंदू समाजाने ज्या वेदिक ज्ञानाची आपल्या कुवतीप्रमाणे जपणूक केली आहे, त्या **मूल्यवान** 'ठेव्यांकडे' (त्या बहूमोल ज्ञान पद्धतींकडे) पाठ फिरवून उभा आहे!!

शिवाय, ज्या संस्था, व्यक्ती ह्या ठेव्याच्या पेटाऱ्याच्या किल्ल्या स्वत:च्या क्षुद्र, अहंकारी व बुवाबाजीच्या व 'प्रॉफेट सारख्या बादशाही, सत्ताधारी 'वृत्तीने खिशांत घालून बसलेल्या आहेत, त्या व्यक्तीसुद्धा - पाश्चात्य भौतिक ज्ञानाच्या पद्धतीचाच नकळत व अभावितपणे पुरस्कार करतात. ही माणसे थोडीशी भारतीय व बहूतांशी पाश्चात्य संस्कृतीचा भार वाहत आहेत.

पण, दुसऱ्या बाजूला जी थोडीशी कर्मठ व आचारविचारांनी भारतीय, हिंदू व वेदिक विचारांचा व संस्कृतीचा संभाळ करण्याच्या पवित्र्यात व अविर्भावात पाय रोवून उभी दिसतात, त्यांनाही संस्कृतीची, खरी बीजे पूर्णपणे ज्ञात झालेली दिसत नाहीत. त्यांच्या ज्ञानसंभाराला रूकावट **व्याधी** लाभली आहे. ज्ञानाच्या अनंत प्रवाहाला ते अनुकूल नाहीत. त्यामुळे, त्यांच्या संख्येत तेच 'अल्प' असल्याने समाजाला दुसरे पर्याय उपलब्ध होताना दिसत

नाहीत!!

**अनुभवांचे निष्कर्ष :**

मी जे हे सर्व सांगतो आहे हे माझ्या गेल्या वीस वर्षाच्या प्रयत्नांचे, अनुभवांचे सार आहे. माझ्या ह्या 'दर्शना' बद्दल मी 'प्रतिवाद' करावयालाही तयार आहे, कारण मला संस्कृतीचा हा गाडा किंवा 'वेदिक दिव्य रथ' गतीहीन झाला आहे, अशी भावना झाली आहे. ह्या रथाचा सारथी गीतेतील 'भगवान कृष्ण' नसून कोणी तरी क्षुल्लक, भंपक राजकारणी, सामान्य कुवतीचा 'यादव' च आहे. व तो भौतिकवादी सत्ताधारी राजकारणीच आहे, असे मनोमन वाटते!! **'यादव' याचा अर्थ जाती वाचक नसून, भौतिक यादवी युद्धांत रमणारा असा घेतला जावा.**

**समाजाची प्रगती :**

समाजाची प्रगती व्हावी असे अनेकांना वाटते. पण, प्रगतीच्या व्याख्या वेगवेगळ्या आहेत.

राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्याकडे नजर टाका. प्रत्येक पक्ष तांदूळाच्या दोन किलोच्या स्वस्त वाटपाचे आश्वासन देतो आहे. ही परिस्थिती का आली याचे 'आत्मपरीक्षण' नाही. स्पर्धा आहे, राजकीय किंवा वैयक्तिक सत्तेसाठी. बौद्धिक जैविक सत्यासाठी नाही.

**'वेदिक सत्य' :**

**पुरुषसूक्त** हे विश्वाच्या दैवी व अविचलित तत्वांचे दर्शन देते. त्यांत **प्रत्येक जीव (पृथ्वीवरील) हा श्वासोश्वास करील व अन्न ग्रहण करील** असे सांगते. ह्याचा खरा अर्थ हा कीं ही व्यवस्था **विश्वाच्या रचनेतील मूलतत्व** आहे व त्याची सर्व जबाबदारी परमेश्वराची व त्याच्या आज्ञेने प्रकृतिची वा पृथ्वी व इतर जगताची आहे.

तेव्हा, **धान्य निर्मीती, ही 'कृष्टि', जमीन, पाऊस व धान्य बीज ह्यांच्या 'अनंत, अविचलित, अविनाशी तत्वावर व पुरवठ्यावर आहे व आश्वासलेली आहे.** मग, मानवी राजकीय व्यवस्था व आर्थिक व्यवस्था काय करते आहे, तर त्या **'विश्व अन्न रचनेचा' एकांगी 'मानवकेंद्रित' व अर्थसामर्थ्याच्या विषम रचनेखाली विकृत वितरण व्यवहार करते आहे.**

थोडक्यात म्हणजे विश्वरचनेमध्ये, निसर्गामध्ये ज्या योजना भक्कम तत्वांवर आधारून केलेल्या आहेत त्यांची खरी जाणीव व दखल वा आदर आपल्याला नाही. आपण त्यांत आपल्या विचारांच्या असंमजस, अनौतिक, अविचारी 'अविष्कारांनी' दंगल करतो आहोत. मानवी शहाणपणाची ही दर्शने कां बरे वारंवार होत रहातात? ह्या अध:पाताचे खापर निसर्गावर वा देवावर मारून 'मानवी वृत्तींची' जबाबदारी कां टाळतो?

त्याचे एक मुख्य कारण ह्या विश्वाच्या, पृथ्वीच्या व मानवी जीवनाच्या 'सत्य' दर्शनाला, शाश्वत तत्वांना आपण सामोरे जात नाही.

मानवी शरीर नाशिवंत आहे. पृथ्वीवरील संपत्ती मर्यादित आहे. सुखाच्या कल्पना बेजबाबदार व स्वार्थी दर्शनावर आधारलेल्या आहेत. शरीराला प्राप्त असणारी 'ज्ञानेंद्रिये' ही पशूवृत्तीची आहेत.

त्यांना 'दैवी संपदेकडे' झुकवण्याच्या पारंपारिक उपदेशाला आपण लाथाडून दिले आहे. **असे कां व्हावे?**

**सामाजिक अवनतीची कारणे :**

अवनतीची अनेक कारणे आहेत. त्यांची कोरडी यादी कोणीही करूं शकेल व नुसता गोंधळच माजेल.

पण, प्रश्नाची सुरवात केली पाहिजे कीं मानवी जीवन, ह्या पृथ्वीवर कां अवतरले? ह्या मानवी जीवनाचा जो 'शरीरबद्ध' आकार वा नाशिवंत रूप (Form) दिसते, त्याचे खरे सत्य कोणते? ह्या मानवी जीवनाचा हेतू काय? या

उलट हेतूशून्य जीवन व भौतिक सुखोपभोगासाठी जीवन असा सामान्य अर्थच घ्यावयाचा काय?

तसे नसल्यास ह्या प्रश्नांची उत्तरे कशी मिळणार? नुसत्या या प्रश्नापर्यंत प्रवास व्हावयालाच माणसाला ७०/८० वर्षे लागतात. त्यामुळे ह्या प्रश्नांची उकल होण्यासाठी आज हा मानवी समाज भौतिक विज्ञानावर व त्याच्या भौतिक ज्ञानेंद्रियाच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास ठेवून उभा आहे.

ह्याचाच अर्थ हा होतो कीं मानवी व्यक्तीगत जीवन जरी मर्यादित सुमारे १०० वर्षे असले, तरी पूर्वीच्या पिढीच्या मानवांनी जे प्रयत्न केले, त्याचा 'इतिहास, कथा, वृत्त, रिपोर्ट, सूत्र व अनुभवांच्या कथा, भावविश्वातील धडपड, यश वा अपयश ह्यांची कहाणी, तसेच त्या त्या पिढ्यांची स्वप्ने यांची देणगी नव्या पिढीला मिळण्याची नैसर्गिक व मानव निर्मीत यंत्रणा अस्तित्वात आहे.

पण, हे तर सामान्य बुद्धीला झेपणारे स्वरूप आहे. पण, ह्या दीर्घ काळात होणाऱ्या ज्ञानाच्या, अनुभवाचा हस्तांतरणांत काही त्रुटी राहून जातात. भाषा, अनुभवांची जात व अर्थ बदलतात. अर्थांची दर्शने व निष्कर्ष बदलतात. जीवनाची उद्दिष्टेच बदलतात व त्यामुळे ह्या विशाल अनुभव व ज्ञानाच्या पोतडींतून जी निवड (selection) होते तेही त्याच्या जातवारीने व मूल्यांकांने बदलते. काही महत्वाच्या गोष्टी हरवतात, काही क्षुद्र गोष्टी संभाळल्या जातात.

हे अपरिहार्य आहे व म्हणूनच ज्या संस्कृतीने ह्या पिढ्या व वंशविस्ताराच्या जीवनक्रमात आपली ज्ञानाची कवाडे विस्तीर्ण व उघड ठेवली व पितरांच्या ज्ञानाचा, अनुभवांचा, तंत्रांचा, भावनांचा, स्वप्नांचा ठेवा जपला फक्त त्यांची '<u>ज्ञान संग्रहालये श्रीमंत राहिली</u>.'

**<u>भारतीय संस्कृती ह्या व्यवहारांत श्रेष्ठ ठरली आहे. ह्यांत शंका नाही!!</u>**

**कुल व शील निर्मीती व जोपासना :**

मग, आता थोडक्यात आपल्या आजच्या विषयाकडे वळू या.

मागील दिशाच्या मार्च २००९ ह्या अंकात संस्कृतीतील बहूमूल्य भाग म्हणजे '<u>कुल व शील</u>' ह्यांची निर्मीती, जतन व वृद्धी वेदिक ज्ञानपद्धतीत कशी ग्रहण केली आहे हे सांगितले. ह्याची साद्यंत व प्रामाणिक वर्णने **<u>'ऐतरीय ब्राह्मणांत'</u>**★ मिळाली. ती वाचतांना अचंबा वाटला. ही वर्णने वरवर वाचणाऱ्याला त्याचा '<u>खरा बोध</u>' होणार नाही व 'सध्याच्या **विशिष्ट व्यवहारी बुद्धीला** (Rational mind) पटणार नाहीत, हे उघड व अपेक्षितच आहे. तरीपण, ही वर्णने जे परिश्रम घेऊन लिहीलेली दिसतात, ते लक्षात घेतल्यावर, ती अर्थ लावण्याच्या प्रयत्नात रस न घेता टांकून दिल्यास, आपल्यावरच अन्याय व पुढच्या पिढीवर जास्त अन्याय होईल. त्यातील ज्ञानाच्या गुत्प, अगम्य व गूढ तंत्रांचा लोप होईल.

विश्वाच्या अफाट पसाऱ्यात, पृथ्वीवर एक फार मोठा प्रयोग चालू आहे. तो परमेश्वराच्या इच्छेवर चालला आहे. ह्या विधानावर अडचण येणार असेल, तर **Naturalistic Philosophy** किंवा भौतिकवादी विज्ञानाच्या कल्पनेप्रमाणे प्रकृतिमार्फत छुपा कार्यक्रम राबविला जातो आहे. तो प्रयोग म्हणजे Consciousness किंवा चैतन्यबुद्धीचा प्रमाणात, त्या बुद्धीची पातळी उंचावणारी, विस्तार करणारी व दिव्यतेकडे झुकणारी अशी प्रगती चालू आहे. तिची गती मानवी आयुष्याच्या कालमापन प्रमाण वा मात्रेत फारच सूक्ष्म व अल्प प्रमाणात आहे असे वाटेल. पण, अनेक विचारवंतानी, संतानी, ऋषींनी, तत्वचिंतकांनी ह्याचा मागावा घेतला, कारण, त्यांच्या अनुभूतीत त्यांना ह्यांचा सुगावा लागला आहे.

पण, त्या प्रगतीच्या दिशा, हेतू व प्रत्यक्ष क्रिया ह्याबद्दल 'एक-वाक्यता' नाही. नुसते अंदाजच आहेत.

पण, संस्कृतीच्या गाभ्यांत **<u>'कुल व शील'</u>** ह्यांचा उगम कसा होतो व त्याच्या क्रिया 'अव्यक्त जगांत' कोणत्या यज्ञक्रियेने होतात ह्याचे सविस्तर वर्णन 'ऐतरेय ब्राह्मणात' सांपडते. दिशाच्या फेब्रुवारी व मार्च २००९ या अंकात चर्चा केली आहे.

एकतर अशा क्रिया कशा घडतात त्याबद्दल आधुनिक शास्त्रे अज्ञानी आहेत. **Social Sciences, Dialectical processes, Psychological, Neurological, Cognitive Sciences** ह्यांच्या आवाक्यातही न बसणारे हे विषय इतक्या अधिकारवाणीने वेद, ब्राह्मणे व पुराणे यांत सांगितले जातात, तेव्हा एक साधा विचार करावयाला हरकत नसावी कीं त्यावेळच्या समाजाला 'कूल व शील' ह्यांचा अंतर्भाव संस्कृतीमध्ये असावा ह्याबद्दल एक तऱ्हेची उच्च सात्विक उंची होती. त्याचा प्रत्यय येतो. त्यानंतर, प्रत्यक्षात ह्या क्रिया कशा होतात, हे पुढच्या पिढीला सांगण्याची कर्तव्यबुद्धी होती. हेही दिसते.

एव्हढे जर ह्या पौराणिक समाजाला श्रेय द्यावयाचे मान्य झाल्यास, त्यांच्या प्रत्यक्षीकरणामध्ये कांही अगम्य भाग आले तर ती आपल्यातील कमतरता आहे असेच मानावयाला नको काय? किंवा त्याच्याही पलीकडे जाऊन त्या पद्धती शोधण्यासाठी किंवा त्याची सुधारीत व आपल्या काळाला झेपेल अशी कृती मानवी समाजाच्या हातात देण्याची उत्सुकता, तप साधना व 'रिसर्च' संशोधन व्हावयाला नको काय? समाज वा सत्ताधारी ह्या जबाबदारीबद्दल थंड कां आहेत?

पण, थोडेसे खेदाने असेच म्हणावेसे वाटते, कीं सध्याच्या काळातील विचारवंताना ह्या दैवी संपदा किंवा दिव्य सुसंस्कृततेकडे जाण्याच्या ह्या उद्योगांबद्दल उत्सुकता दिसत नाही.

सध्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणात मानवी व जीवसृष्टीचा संहार करण्यासाठी जास्त सामर्थ्याची व संहारक शक्तीची शस्त्रे व अस्त्रे शोधण्याचीच धारणा असलेली दिशा आहे. अत्यंत निषेधार्ह असा हा भाग आहे.

हा दोष नवीन पिढीतील युवकांच्या माथ्यावर लादणे अन्यायकारक होईल, कारण त्यांना ज्या जीवनाच्या संग्रामातून, शिक्षणाच्या बाजारातून जावे लागते, त्या यंत्रणेमध्ये त्यांची 'सात्विक वृत्ती' पद्धतशीरपणे मारून टाकली जात आहे. समाजाचा हा आसूरी अविर्भाव आज कार्यरत आहे व त्याचाच परिणाम नवीन पिढीच्या सांस्कृतिक मनाच्या घडणींत अवतरला आहे.

ह्या दोषारोपातून बाजूला पडून आपण आपल्या संस्कृतीने जपलेल्या सांस्कृतिक शिक्षणाच्या कोणत्या यंत्रणा निर्माण केल्या होत्या ते पाहू या.

**दिशाचा पुढचा अंक :**

पण, त्यासाठी दिशाच्या मे २००९ च्या अंकाची वाट पहावयाला लागणार आहे. तेव्हा पुन्हा भेटू या!!

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी, अग्यारी लेन,
ठाणे - ४०० ६०१
दूरध्वनी - २५३६८४५०, ९००४०५१८४७
E mail;: yrsane@eth.net

●●●

(*** पान नं. १८ भारतीय संस्कृती, पान नं. १७ दिशा, फेब्रुवारी २००९**)

# शिक्षण महर्षी कै. वा. ना. बेडेकर यांच्या लेखणीतून

*१४ एप्रिल हा शिक्षण महर्षी कै. वा. ना. बेडेकर यांचा स्मृतिदिन. त्यांच्या आठवणीशिवाय दिवस जात नाही. १४ एप्रिलच्या निमित्ताने त्यांच्या 'स्मृतिलहरीतील' काही आठवणींच्या चौकटी स्मृतिगंधवरून येथे साभार उद्धृत करत आहोत - संपादक*

## राजापूरातील माझी शाळा

राजापूर हे कोकणातील इतिहास प्रसिद्ध शहर व तालुक्याचे ठिकाण पण गेल्या तीन चार दशकांत राजापूर येथील इंग्रजी शाळेमुळे प्रसिद्ध पावले! या शाळेचा मला अभिमान वाटतो. माझ्या त्या काळच्या शिक्षकांबद्दल मी अजूनही नितांत आदर बाळगून आहे. त्यावेळेपासूनच ही बहुउद्देशीय शाळा आहे. या शाळेच्या उन्नतीसाठी आपले सर्व जीवन सार्थकी लावणाऱ्या त्या शिक्षकांच्या स्मृतीला मी अभिवादन करतो. मॅट्रिकचे वर्ष शाळेत फार महत्त्वाचे मानले जायचे. शिक्षकांच प्रमुख विषयांकडे विशेष लक्ष व सर्वच मुलांकडे सारखे लक्ष असायचे. या शाळेचे यापूर्वीचे बोर्डाचे निकाल गौरवास्पद होते. त्यावेळी मुंबई इलाखा व सिंध प्रांत यांची मॅट्रिकची परीक्षा एकत्र होत असे. १९३५ साली मी मॅट्रिक पास झालो.



त्यावेळी मॅट्रिक पास होणे हेही मानाचे आणि महत्त्वाचे मानले जाई. कोठेही नोकरी शोधायची झाली तर मॅट्रिक हा परवलीचा शब्द होता.

## निसर्ग हाच देव असावा

अदृश्य मानसिक देवापेक्षा दृश्य वा अदृश्य पण निश्चितपणे जाणवणारा निसर्ग हाच देव असावा असे मला वाटते ! प्रतिवर्षी पाऊस कमी जास्त पडतो. जीवन भूतलावर मुक्तपणे वाहते. दडलेली बीजे अंकुरतात. सृष्टी पुनः एकवार हिरवीगार बनते. हरिततृष्णाची मखमल सर्वत्र पसरते. डोंगर टेकड्या हिरव्या वैभवात नटून जातात. अनेक ठिकाणी पाण्याचे प्रपात शुभ्र स्फटिकासारखे दिसतात आणि सातत्याने वाहत असतात. ऋतु बदलला म्हणजे हे रूप बदलते. हिरवळ नष्ट होते. बीजे मातीत दडून जातात. हा ऋतुसंहार आणि पुनर्जीवन चक्रनेमिक्रमेण चालूच आहे. चालूच राहणार. मग निसर्गम्हणजे देव का ?

## पाण्यासाठी भगीरथ प्रयत्न

माझ्या राहत्या घरापासून हजार फूट अंतरावर नाईक वाडी आहे. तेथील विहिरीला महामूर पाणी असलेले पाहिले. या ठिकाणी पंप बसवून नळाने पाणी नेता आले तर फार बरे होईल. नाईक वकिलांनी मोठ्या मनाने मला पंपाने पाणी घेण्यास परवानगी दिली. स्वामित्वाचा एक रुपया घेण्यापलीकडे त्यांनी कसलीही अट घातली नाही. लौकरच विहिरीवर पंप बसवला आणि त्यांचे घरापासून गावदेवी मैदानातून, अंडरग्राउंड पाईप लाईन टाकून मी पाणी घेतले. हे सर्व करताना नगरपालिकेने मला रीतसर परवानगी दिली.

## नुसती हळहळ वांझ असते

ठाण्यातील शैक्षणिक क्षेत्रात मी सर्वप्रथम १९५७ साली पहिले पाउल टाकले. गोखले वाडी गोठ्यात भरणारी शाळी मी व्हिजिटसाठी गेलो असताना पाहिली १ ऑगस्ट १९३५ साली स्थापन झालेल्या विद्या प्रसारक मंडळाची रजिस्टर मराठी खाजगी शाळा दुर्दशेतच होती. मुलं ओल

झालेल्या जमिनीवरील फळीवर बसलेली होती. त्या मुलांबरोबरच माझी मुलगी शैला बसलेली मी पाहिली. मला खूप वाईट वाटलं. नुसतं वाईट वाटून उपयोगाचं नाही ! कृती करायला हवी नुसती हळहळ नपुसंक ठरते ! तिला कृतिशीलतेची जोड हवी.

## कॉलेजचे दिवस

जूनमध्ये पुण्याला येऊन सर परशुराम भाऊ कॉलेजमध्ये नाव दाखल केले. कॉलेजच्या दुसऱ्या टर्ममध्ये ४ दिवस मला उपाशी रहावे लागले. खानावळीत जेवायला पैसे नव्हते. कोणा मित्राकडे हात पसरणे लाजिरवाणे वाटत होते. चणे-फुटाणे खाऊनच दिवस काढत होतो. ही परिस्थिती घरमालक आपटे यांना कळली. त्यांनी मला बोलावून दहा रुपये दिले आणि सांगितले, ''चल जेवून ये. मी तुला काम देतो. पैसे घ्यायला लाजू नकोस.'' त्यावेळी खेडोपाडी ग्रामोफोन लावून शिक्षण प्रसार करुन, अंधश्रद्धा निमूर्लन करणं ही कामं 'ॲडल्ट एज्युकेशन लीगला' सरकारकडून मिळाली होती. या ग्रामफोन रेकॉर्डला लागणारे संवाद लिहिण्याचे काम श्री. आपटे यांनी मला त्यावेळी दिलं होतं.

('स्मृति-लहरी'तून)

●●●



## जैविक संशोधनांसबंधी

अमेरिकेमधील एका सर्वेक्षणामध्ये असे आढळून आले आहे की, 'बायोसिक्युरिटीच्या' (जैविक सुरक्षेच्या) कारणास्तव अनेक जीवशास्त्रज्ञ आपल्या संशोधनांच्या कार्यपद्धतीत बदल करत आहेत.

दहशतवादी व अन्य समाजविरोधी घटक जीवशास्त्रामधील संशोधनांच्या तपशीलांचा, त्यांच्या निष्कर्षांचा गैरवापर करत आहेत. त्यामुळे संशोधनविषयक धोरणांची आखणी करणारे संबंधित व जीवशास्त्रामधील संशोधक शास्त्रज्ञ या मुद्याकडे लक्ष वेधत आहेत. सध्या अमेरिकेत यासंबंधी चर्चा चालू आहेत.

अशा प्रकारचे गैरवापर टाळावेत या दृष्टीने शासनाने नवे कायदे करावेत, नियम करावेत व निर्बंध वाढवावेत आसे शास्त्रज्ञांचे मत आहे. असे कायदे बनत नाहीत तोवर शास्त्राज्ञांची मानसिकता अशा प्रकारचा दुहेरी वापर होऊ शकेल अशा संशोधन प्रकल्पांना नकार देण्यात बदलत आहे. इतकेच नाही तर अशा स्वरूपाच्या प्रकल्पांवर काम करण्यासाठी येणाऱ्या परदेशातील विद्यार्थ्यांच्या विचार करायचेही हे शास्त्रज्ञ टाळत आहेत.

बायोसेफ्टी (जैविक निर्धोकला) व बायोसिक्युरिटी या विषयांना यामुळे तेथील संशोधन क्षेत्रात आता वेगळेच महत्त्व आले आहे.

'सायन्स' या साप्ताहिकावरून संकलित
(संदर्भ खंड ३२३, ६ फेब्रु. २००९; पृ. ६९९)

●●●

पुस्तक परिचय

# सहजीवनावरील वेगळे पुस्तक - द्विगुणीत

नवरा-बायकोचे नाते क्षणाक्षणाला फुलासारखे बहरत जाते तेव्हा त्या सहजीवनाची सुहृदगाथा बनते. त्यात दोघेही आपापल्या क्षेत्रात कर्तृत्वाच्या शिखरावर आल्यानंतरही संवाद फुलत राहिला तर त्या दोघांच्या अस्तित्वाची एक बनलेली कहाणी सुंदरशा कवितेत रूपांतरित होत जाते. मराठी जीवनामधल्या अशा एकवीस सहजीवनांमधून फुललेल्या भावकवितांचा मनाला मोहवून टाकणारा अविष्कार म्हणजे डॉ. शुभा चिटणीस यांचे 'द्विगुणीत' हे पुस्तक. डॉ. शुभा चिटणीस यांच्या पुस्तकाचे सूत्र, मध्यवर्ती कल्पना ही नेहमीच वेगळी असते. त्याप्रमाणे या पुस्तकासाठी त्यांनी कर्तबगार अशा नवरा-बायकोचे सहजीवन, त्यांच्या संसारवेलीचे बहरणे हे सूत्र घेतले आहे.

या पुस्तकाचा 'आस्वाद' लिहितांना (कै.) रविंद्र पिंगे म्हणतात, 'तशा या केवळ वर्तमानपत्री, रुटीन मुलाखती नाहीत.' या माहितीवजा व ठोकळेबाज मुलाखती न वाटता कै. पिंगे यांना तो व्यक्तीशोध वाटला आहे. या पुस्तकाचे ते खास वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. 'या हृदयीचे त्या हृदयी' सजवण्यात यशस्वी ठरलेल्या, 'दो जिस्म मगर एक जान' असणाऱ्या संवेदनशील पती-पत्नीच्या सहअस्तित्वाचा विकास, त्यांची एकमेकांतील 'गुंतवणूक' याचे पदर अतिशय तरलपणे डॉ. शुभा चिटणीस यांनी उलगडून दाखवले आहेत. पती व पत्नींच्या सहजीवनाची ही उत्तम अशी संसारचित्रे आहेत.

या भावकवितांच्या 'उमलसंग्रहात' समावेश असणाऱ्या २१ मराठी जोड्या या कला, साहित्य या क्षेत्रांबरोबरच उद्योग, पर्यटन अशा क्षेत्रांत भरीव योगदान केलेल्या, कार्यरत असणाऱ्या जोड्या आहेत. या लेखाची मांडणी ठोकळेबाज नसल्याने नवऱ्याची मुलाखत, मग बायकोची मुलाखत असे पाणिबंद वर्गीकरण नाही. दुधात विरघळलेली साखर दुधातून काढणे अशक्य असते. त्या दुधातील साखरेच्या गोडीप्रमाणेच ही अस्तित्वे आहेत. त्यांचे एकमेकांचे संदर्भ सांभाळत उमलणे हे गाणाऱ्या शब्दांतूनच उलगडत जाते.

या सहजीवनांची सुहृदयगाथा लिहीत असतांना डॉ. शुभा चिटणीस यांनी वापरलेली भाषा ओघ असणारी आहे. या दांपत्यांबद्दलची अचूक निरिक्षणे व तीही नेमक्या, मोजक्या व अर्थवाही शब्दांतून त्या मांडतात. या दृष्टीने पुढील दोन - तीन उदाहरणे पाहण्यासारखी आहेत. ज्येष्ठ संगीतकार यशवंत देव व करुणा देव यांच्यावरील लेखाचा समारोप करतांना त्या म्हणतात, 'काहीसे विरक्तीच्या मार्गावर उभे असणारे हे यशवंत देवांचे प्रेमस्निग्ध घर जणू करुणेच्या काठावर परस्परांत निमग्न आहे' (पृ. ३८). वंदना आणि ॲड. शिरीष गुप्ते यांच्या संदर्भात त्या लिहितात, 'भिन्न, भिन्न व्यवसायातले पण नाट्यरंगच पाहणारे, अनुभवणारे आणि किर्ती शिखरावर उभे असलेले हे दांपत्य घरात शिरता क्षणीच बाहेरचे मुखवटे उतरवून, मुखवट्यांचे जग विसरून घरात आणि घरच्यांशी छान एकरूप होत जात असते.' (पृ. ५१). नाट्यलेखन, दिग्दर्शन या क्षेत्रातील सुकन्या कुलकर्णी व संजय मोने यांच्याबद्दल शुभाताई लिहितात, 'पुन: पुन्हा नव्याने नाटक रंगत असते. जीवनही रंगत असते. मुखवटे केव्हा चढवायचे, केव्हा उतरवायचे हे दोघांनाही नीट कळलेले आहे.' (पृ. १०७). अशी वैशिष्ट्यपूर्ण व आशयसमृद्ध डूब असणारी निरिक्षणे हा डॉ. शुभा चिटणीस यांच्या शैलीचा आणि मित्रत्वाच्या भावनेचा अतिशय हृद्य भाग आहे.

व्यक्तीचा अभ्यास करतांनाच त्या व्यक्तीच्या सहवासातील गुंफणीचा अभ्यास करायचा व त्यातून एक सहवासचित्र शब्दांकित करायचे हे तसे कठीणच आहे.

मराठीत व्यक्तीचित्रे असणारी अनेक पुस्तके आहेत, पण व्यक्ती करत असलेल्या संसारातील काव्य फुलवणारे 'द्विगुणीत' सारखे पुस्तक अपवादात्मकच म्हणावे लागेल.

दांपत्याची निवड हेही या संग्रहाचे एक वैशिष्ट्य आहे. प्रकाशझोतात असणाऱ्या, कार्यमग्न आणि कर्तृत्ववान व्यक्तींच्या सहजीवनाबद्दल सामान्यांच्या मनात अनेक प्रश्न असतात. 'कसे असतील हे पती-पत्नी' इथपासून ते 'घरात कसे वागत असतील' इथपर्यंतचे अनेक प्रश्न वाचक व रसिकांच्या मनात असतात. लेखिकेने ही संसारातील सहवास चित्रे रेखाटतांना या बाबीचे अचूक भान ठेवले आहे. एकमेकांत मिसळून गेलेल्या दोन रेषांचे हे चित्र दोन्ही रेषा, दोन्ही व्यक्तीमत्त्वे अलगदपणे रेखाटते. दोघांचे स्वतंत्र अस्तित्व आणि तरीही अपरिहार्य गुंतलेपण हे म्हणूनच पुस्तक वाचतांना मोहवत राहते.

ज्या २१ दांपत्यांच्या सहजीवनाचा समावेश पुस्तकात आहे ती दांपत्ये पुढीलप्रमाणे -

१) सुप्रिया व सचिन पिळगांवकर, २) नेत्रा व भाऊ साठे, ३) करुणा व यशवंत देव, ४) वंदना व शिरीष गुप्ते, ५) श्रावणी व देबू देवधर, ६) राणी व मिलींद गुणाजी, ७) अपर्णा व रामदास पाध्ये, ८) प्रतिभा व रत्नाकर मतकरी, ९) सुकन्या कुलकर्णी व संजय मोने, १०) आशा व माधव खाडिलकर, ११) वीणा व भारतकुमार राऊत, १२) निशिगंधा व दीपक देऊळगांवकर, १३) रजनी व सुभाष दांडेकर, १४) सुचित्रा व माधव भागवत, १५) चंद्रकला व कुमार कदम, १६) चारुशीला व सुधीर निरगुडकर, १७) वीणा व सुधीर पाटील, १८) प्रतिमा व अजित वैद्य, १९) निर्मला व बाळ आपटे, २०) माणिक व राज शिंगे आणि २१) उल्का व अजित नातू.

या पुस्तकाची परचुरे प्रकाशन मंदिर ही प्रकाशक संस्था आहे. त्यांच्या परंपरेला साजेशी पुस्तकाची निर्मिती झाली आहे. परंतु एका ठळक त्रुटीची नोंद घेणे महत्त्वाचे वाटते. व्यक्तींची संसारचित्रे वा सहवासचित्रे रेखाटतांना या पुस्तकात इतर अनेक व्यक्ती व संस्था यांचे संदर्भ ओघात आलेले आहेत, तसे ते येणे हे अनिवार्यच आहे. या व्यक्ती व संस्थांच्या नावांची नामनिर्देश सूची शेवटी दिली गेली असती तर संदर्भासाठी तिचा चांगला उपयोग झाला असता. वाचकांना संदर्भ पाहतांना अशा सूचीचा उपयोग होतो.

तसेच प्रत्येक लेखाच्या शेवटी त्या दांपत्याबद्दल लिहून झाल्यावर, त्या तारखेला असणारा संपर्काचा पत्ता, दूरध्वनी ही माहिती देण्यात आली असती तर संपर्काच्या दृष्टीने तिचा उपयोग झाला असता. या पुस्तकाच्या पुढील आवृत्तीत या त्रुटी दूर सारता येतील अशा आहेत. लेखक व प्रकाशकांनी या सूचना अवश्य लक्षात घ्याव्यात.

एका वेगळ्या सूत्राभोवती लिहिलेल्या या सहवास चित्रसंग्रहाबद्दल डॉ. शुभा चिटणीस यांचे अभिनंदन करायला हवे. मराठी दांपत्य जीवनाला एका वेगळ्या मखरात त्यांनी नेऊन ठेवले आहे.

- 'द्विगुणीत' - चिटणीस, शुभा
- मुंबई, परचुरे प्रकाशन मंदिर, २००८
- पृष्ठे १४, २५४, मूल्य रु. २०० /- फक्त

**श्री. मोहन पाठक**
ठाणे

●●●

# 'एक रात्र शाळेत'

*आमच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील दोन कार्यक्रमांचा विशेष वृत्तांत - संपादक*

'बालपण दे गा देवा, मुंगी साखरेचा रवा' बालपण माणसाच्या आयुष्यातील सोनेरी काळ. बालपणीच्या आठवणी आयुष्यभर माणसाला आनंदच देतात. त्यातूनही शालेय जीवनातील गमती-जमती तर विचारूच नका. शाळेत घालवलेले अनेक क्षण आपल्या सुंदर आठवणी बनून आयुष्यात अनेकदा आपल्या चेहऱ्यावर स्मितहास्य उमटवतात. याच आठवणींमध्ये भर टाकण्याचा प्रयत्न आम्ही शिक्षक शाळेतील वेगवेगळ्या उपक्रमांतून करत असतो.

असाच एक उपक्रम म्हणजे एक रात्र शाळेत मुलांबरोबर आपल्या शिक्षक व सवंगड्यांबरोबर राहण्याचा. सिनीयर के. जी. ची मुले एक रात्र शाळेत चक्क रहातात. यामागचा अजून एक हेतू म्हणजे मुलांना स्वावलंबनाची सवय लावणे. एरव्ही घरी 'लहान आहे अजून' या नावाखाली मुलांना पालक फार कमी वेळा स्वावलंबनाची सवय लावताना दिसतात.

पण नवल म्हणजे मुलांना स्वत:च्या गोष्टी स्वत:च करण्यात जो काही आनंद असतो ना तो काही औरच. या वर्षी १७ जाने. च्या शनिवारी संध्याकाळी ७ वा. सिनीयर के. जीत शिकणारी ९७ मुले शाळेत आपल्या छोट्या बॅगा घेऊन आनंदात हजर होती. पालकांच्या चेहऱ्यावर थोडी काळजी दिसत होती आणि मुलांच्या उत्साहाला उधाण आले होते.

मुलं सर्वप्रथम आपापल्या वर्गात गेली. सर्वांनी बॅगा ठेवल्या आणि आपल्या मित्र-मैत्रिणींबरोबर धम्माल करायला सुरुवात केली. काही जण शिक्षिकांबरोबर खेळत-मस्ती करत होते, तर काही चक्क नाचत होते.

नंतर सर्व मुलांना खाली खेळण्यासाठी नेण्यात आलं सर्व वर्गांसाठी शिक्षिकांनी वेगवेगळ्या खेळांच आयोजन केल होत. मुलांबरोबर शिक्षकही लहान होऊन खेळाची मजा लुटत होते. एक संघ म्हणून खिलाडू वृत्तीने खेळ कसे खेळायचे, हार जीत कशी स्वीकारायची या सगळ्याचे शिक्षण नकळत मुलांना या सगळ्या खेळांतून मिळत असते.

खेळून मुलांना चांगलीच भूक लागली होती. मग सर्वांना विद्यालंकार सभागृहात जेवण्यासाठी नेण्यात आल. पावभाजी आणि गुलाबजाम असा त्यांचा आवडता बेत असल्याने मुलं पोटभर जेवली. स्वत:ची ताटली जागेवर ठेवून हात वगैरे धुवून परत खेळायच्या मूडमध्ये.

नंतर आम्ही सर्व मैदानात गेलो. तिथे शेकोटीची तयारी केली होती. आमच्या के. जी. विभाग प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांनी शेकोटी पेटवली. त्याभोवती सर्वांनी फेर धरून गाणी म्हटली. खेळून, नाचून आता मात्र मुलं खरच दमली होती.

मग सर्वजण वर्गात गेले. सर्व मुलांनी स्वत:च रात्री



**शाळेतील मुलांचा एक रात्र मुक्काम**

घालायचे कपडे पिशवीतून काढले आणि घातले सुद्धा. बटण लावण्यास थोड्या जणांना मदत वगळता सर्व काही स्वत:च पार पाडल्याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर अनुभवला. शिक्षिकांच्या मदतीने अंथरूणे घालण्याचा कार्यक्रम झाला. मग सर्वजण झोपी गेले.

सकाळी साधारण ७ च्या सुमारास मुलं उठली. बॅगमधून ब्रश काढला, पेस्ट शाळेतल्या मावशींनी दिली. दात घासून ब्रश जागेवर गेले सुद्धा! मग सर्व मुलांना बोर्नव्हिटा घालून दूध देण्यात आलं. आपल सामान नीट भरून बॅगा घेऊन रविवारी १८ तारखेला सकाळी ८ वाजता मुल घरी जायला तयार झाली.

पालक अतिशय आनंदाने मुलांना येताना बघून खूपच खूश झाले. मुलांनी शाळेतील ही रात्र खूपच मजेत घालवली. शाळेतील त्या सोनेरी दिवसात ही एक रात्र मुलांच्या नक्की स्मरणात राहील याबद्दल शंकाच नाही.

●●●

## आजी आजोबा – शाळेत!

भारतीय संस्कृतीचा पाया म्हणजे एकत्र कुटुंबपद्धती. ज्यात आजी आजोबा घराचा भक्कम पाया मानले जातात. घरातील तरुण सदस्य नोकरीच्या निमित्ताने बाहेर जातात, आणि घरातील लहानग्यांची जबाबदारी आजी आजोबांवरच येते.

या लहान मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने ही अतिशय महत्त्वाची वर्षे, ज्यात हेच आजी आजोबा त्यांच्या सर्व गरजा पूर्ण करतात. नातवंडांना चांगल्या संस्कारांबरोबरच त्यांचे भविष्य घडवण्याचे कामही ते करत असतात. म्हणूनच की काय ही रेशमी बंधांची वीण अगदी मजबूत होते.

या रेशमी नात्याचा आदर, त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करावी म्हणून त्यांच्याकरता वर्षातून एकदा एखादा कार्यक्रम सादर करावा अशी योजना आखली गेली. चार वर्षे अतिशय उत्साहात आणि नावीन्यपूर्ण पद्धतीने ‘आजी आजोबा दिवस’ आम्ही शाळेत साजरा करतो.

या वर्षी १२ जानेवारी रोजी हा ‘आजी आजोबा दिवस’ आम्ही साजरा केला. आजी आजोबांच पारंपरिक पद्धतीने म्हणजे अत्तर लावून स्वागत केले गेले. त्यांच्याच नातवंडांनी शिक्षकांच्या मदतीने तयार केलेल्या फोटोफ्रेमस् देण्यात आल्या. त्या फोटोफ्रेमस् बघून आजी आजोबांच्या चेहऱ्यावरचा आनंद आम्ही सर्वांनी अनुभवला. हे माझ्या नातवाने/नातीने केले आहे? या प्रश्नात आनंद, आश्चर्य आणि अपार कौतुक भरलेले दिसत होते.

कार्यक्रमाची सुरुवात के. जी. विभाग प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि आपल्या भाषणात आजी-आजोबा आणि नातवंड यांच नातं, तसेच हे दोघेही एकमेकांच्या आयुष्याचा अविभाज्य घटक कसे आहेत हे सांगितले.

नातवंडांच्या जन्मापासून लहान बाळाची काळजी कशी घ्यायची, याचं अनुभवी मार्गदर्शन आजी आजोबांकडून नवीन आई-बाबांना करत असतात. साध्या आजारपणात घरगुती औषधं देण, धीराने प्रसंगाला तोंड देण या सगळ्यात ही वडीलधारी मंडळी सतत असतात. अगदी नातवंडाच्या शाळेतील प्रवेश प्रक्रियेपासून ते त्यांच्या शाळेत ने आण करणं, प्रसंगी पालक सभांना सुद्धा हजेरी लावणं ह्या सगळ्यात उत्साहाने भाग घेतात. हे सर्व मुद्दे मेघना टिचरनी आपल्या चार शब्दांत अतिशय सुंदर मांडले.

आजी आजोबांच्या करमणुकीसाठी या वर्षी आमच्याच शाळेतील माध्यमिक विभागात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी काही कार्यक्रम सादर केले. गणेश स्तवन

असलेल्या नृत्याने याची सुरुवात झाली. महाराष्ट्राची लोककला दर्शविणारे विविध नृत्यप्रकार एकत्र करून याचा शेवट ठसकेबाज महाराष्ट्रगीताने झाला.

यानंतर दोन नाटिकांचे सादरीकरण झाले, त्यातील एक होती 'झपूर्झा'. ज्यात आजी आणि नातीचं नातं मुलांनी आपल्या अभिनयातून जिवंत केलं. याची दाद म्हणूनच की काय सगळे आजी आजोबा आपल्या डोळ्यातून येणारे अश्रू थांबवू शकले नाहीत. हीच मुलांसाठी खरी पावती होती.

दुसरी नाटिका होती आपल्या आयुष्यातील सुरांचं तसच गाण्याचं महत्त्व सांगणारी. यातीलही मुलांनी म्हटलेल्या गाण्यांनी आजी आजोबांना आनंद झाला.




**आजी - आजोबा दिवस**

यानंतर सर्व उपस्थितांना खिचडी, गुलाबजाम आणि कॉफी असा अल्पोपहार देण्यात आला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रम संपल्यावर बहुतेक सर्व आजी आजोबांनी कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल शाळेचे आभार मानले. कार्यक्रम आवडल्याची पावतीही दिली.

आजी आजोबांचे समाधानी चेहरे बघून आम्हा सर्व शिक्षिकांचा आनंद द्विगुणीत झाला.

**सौ. प्रिती कुलकर्णी**
सौ. ए. के. जोशी इंग्लिश मिडी. स्कूल,
पूर्व - प्राथमिक विभाग.

●●●

## यांत्रिक सुरक्षा

रोबो, म्हणजे यांत्रिक मानव ही संकल्पना आपल्या परिचयाची आहे. जपानमध्ये टी. ३४ सिक्युरिटी रोबो हा एक वेगळा रोबो बनवण्यात आला आहे. गुन्हा घडत असताना सुरक्षा रक्षक येईपर्यंत गुन्हेगारांना खिळवून ठेवणारा हा संरक्षक रोबो ६० सेंटीमीटरचा आहे. विशेष म्हणजे घडणाऱ्या गुन्ह्याचे चित्रण करून हा रोबो आपल्या नियंत्रकाच्या भ्रमण ध्वनीवर चित्र पाठवतो. दूर संवेदन (रीमोट सेन्सिंग) क्षेत्रातील हे संशोधन असून ३.५ मीटर परिघाच्या कार्यक्षेत्रात या रोबोचे काम चालते.

रोबो बनविणाऱ्या जपानमधील टमसक कंपनीचे प्रवक्ते मॅरिको इशिकावा यांनी हा रोबो सुरक्षा उद्योगाची गरच भागवेल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तारांची गुंतागुंत, केबलच्या तारांची भेंडोळी हे सर्व शून्यावर आणू शकणारा हा यंत्रमानव नजिकच्या भविष्यात व्यापारी तत्त्वावर बाजरात उपलब्ध होणार आहे.

'सायन्स' या साप्ताहिकावरून संकलित
(संदर्भ खंड ३२३, फेब्रु. २००९; पृ. ६९३)

●●●

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्यापन विषयातील नवीन घडामोडी, नवीन ज्ञात क्षेत्रे याबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

# परिसर वार्ता

## सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा माध्यमिक विभाग

**✦ गणित प्रज्ञा परीक्षेचा निकाल :**

इ. ५ वी तील खालील विद्यार्थ्यांना गणित प्रज्ञा परीक्षा २००९ चे प्रमाणपत्र मिळाले -

१) कु. चैतन्य केळकर
२) कु. जान्हवी पाटणकर
३) कु. नेहा केळकर
४) कु. समृद्धी पाटील
५) कु. सिद्धि सांगलीकर
६) कु. तक्ष सत्रा

✦ 'सकाळ' आयोजित बालकुमार चित्रकला स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले :

१) कु. स्वरूप पडाळकर - इ. ६ वी
२) कु. गौरव वैद्य - इ. ८ वी

**✦ गणित पारंगत परीक्षेचा निकाल :**

१००% लागला.

कु. ऋचा ठकार - प्रमाणपत्र विजेती
कु. अझम कर्णिक - उत्तीर्ण

**✦ ज्ञान विज्ञान प्रतिभा परीक्षा २००८-२००९ निकाल:**

प्रथम परीक्षा निकाल १००%. परीक्षेला बसलेले विद्यार्थी - ०३. उत्तीर्ण विद्यार्थी तीन. ह्या विद्यार्थ्यांची निवड द्वितीय परीक्षेसाठी झाली.

**✦ NSTSE युनिफाईड कॉन्सिल परीक्षा २००९ निकाल :**

१००% लागला. परीक्षेला बसलेले विद्यार्थी - ११, उत्तीर्ण विद्यार्थी - ११.

**✦ ठाणे शहर माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळ आयोजित स्पर्धांचे निकाल :**

**चित्रकला स्पर्धा -**

कु. रितिका डोंगरे - तृतीय पारितोषिक

**तबला स्पर्धा -**

कु. रोहित देव - प्रथम पारितोषिक

**संवादिनी स्पर्धा -**

कु. अमोघ वैद्य - प्रथम पारितोषिक

**एकपात्री अभिनय स्पर्धा -**

कु. मधुरा जोशी - द्वितीय पारितोषिक

✦ हिंदुस्थान पेन्सिल्स प्रा. लि. आयोजित चित्रकला स्पर्धेत कु. अनुषा भुबे हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

**स्कौडे विद्यापीठाशी करार :**

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे व स्कौडे विद्यापीठ, स्वीडन यांच्यामधील कराराला अंतिम आकार देण्यासाठी स्कौडे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. लीफ लार्सन त्यांच्या इतर शिक्षक सहकाऱ्यांसमवेत ठाण्यामध्ये आले होते.

स्कौडे विद्यापीठ व विद्या प्रसारक मंडळ यांच्यातील अंतिम करार करण्याचा कार्यक्रम दि. २४ फेब्रुवारी २००९ रोजी ४.०० वाजता विद्या प्रसारक मंडळाच्या व्यवस्थापन महाविद्यालयातील पाणिनी सभागृहात संपन्न झाला. हा करार विद्या प्रसारक मंडळ, ठाणे व स्कौडे विद्यापीठ, स्वीडन यांच्यात झाला. त्यान्वये आपल्या विद्यार्थ्यांना मॉलिक्युलर

बायोलॉजी, मेडिकल बायोटेक्नॉलॉजी यामध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच संशोधन करता येईल. दर्जेदार शिक्षण, सखोल परीक्षण आणि ज्ञानाचा अंर्तभाव या अभ्यासक्रमात आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना स्कौडे विद्यापीठातर्फे पदवी प्रदान करण्यात येईल.

विद्या प्रसारक मंडळातर्फे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर आणि स्कौडे विद्यापीठातर्फे कुलगुरु डॉ. लीफ लार्सन यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

या कराराअन्वये दोन्ही संस्थांतर्फे काही गोष्टी राबवण्यात येतील. त्यामध्ये -

१) नवीन अभ्यासक्रम तयार करणे
२) अभ्यासक्रमाची देवाणघेवाण
३) दोन संस्थांमधील विद्यार्थी व शिक्षकांची देवाणघेवाण
४) दोन्ही संस्थांमधील शैक्षणिक सहकार्य राबवण्यात येईल.

विद्या प्रसारक मंडळातर्फे ह्या अभ्यासक्रमाची व्याख्याने व प्रात्यक्षिके बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात घेतली जातील. तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सींगच्या माध्यमातून स्वीडनहून गेस्ट लेक्चर्स (Guest Lectures) आयोजित करण्यात येतील.

या विद्यापीठाच्या पदवीधारकांना स्वीडन, इतर युरोपीय देश तसेच अमेरिका व कॅनडा मध्ये नोकरीच्या व संशोधनाच्या चांगल्या संधी प्राप्त होऊ शकतील. या जागतिकीकरणाच्या वातावरणात आपल्या भारतीय विद्यार्थ्यांना ही एक अमूल्य संधी असेल.

**वि. प्र. मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

**उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांचा सत्कार :**

शनिवार दि. ७ मार्च २००९ रोजी वि.प्र. मंडळाच्या ठाणे महाविद्यालयाने प्रतिष्ठेच्या अशा मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश या वरिष्ठ पदावर रूजू झालेल्या त्यांच्या दोन माजी विद्यार्थ्यांचा मा. न्यायाधीश श्री. अनिल जोशी आणि माननीय न्यायाधीश श्री. उमेश साळवी यांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. त्यासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी, महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, मंडळाचे प्रतिनिधी आणि मंडळाच्या इतर महाविद्यालयातील प्रतिनिधीही मोठ्या संख्येने थोरले बाजीराव पेशवे सभागृहात उपस्थित होते. तसेच न्यू लॉ कॉलेजचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठाच्या विधी शाखेचे अधिष्ठाता आणि महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. राज्याध्यक्ष हे देखील उपस्थित होते.

मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार यांनी उपस्थितांचे स्वागत आणि कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. श्री. मा. य. गोखले यांनी हा कार्यक्रम म्हणजे जणू एक कौटुंबिक सोहळाच आहे असे आवर्जून नमूद केले. मा. न्यायाधीशांची ओळख व्याख्याता श्री. परांजपे यांनी करून दिली.

उपस्थितांशी संवाद साधताना मा. श्री. अनिल जोशी यांनी महाविद्यालयाचा विद्यार्थी असतानाच्या भूतकाळातील आठवणींना उजाळा दिला आणि तत्कालीन प्राचार्य श्री. तासकर यांच्या तासिकांचादेखील उल्लेख केला. तसेच त्यांचे वकील आणि न्यायाधीश म्हणून झालेले अनुभव कथन केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना कायदा क्षेत्रात कारकीर्द घडवण्यासाठीच्या काही खुबी सांगितल्या. त्याचबरोबर इंग्रजीच्या सखोल अभ्यासाचे कारकीर्दीच्या दृष्टीने असलेले महत्त्वही सांगितले. जात जाता त्यांनी असेही नमूद केले मातृभाषेबद्दलचे प्रेम आणि कारकीर्दीसाठी लागणाऱ्या गोष्टी यांच्यात गल्लत करणे उचित ठरणार नाही. मा. न्यायाधीश उमेश साळवी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना या महाविद्यालयाच्या संध्याकाळाच्या वेळेमुळे मी या महाविद्यालयाकडे आकर्षित झालो. कारण सकाळी मी

नोकरी करत होतो. असे नमूद केले त्याचबरोबर उपस्थितांना त्यांनी दररोजच्या तासिकांना हजर राहण्याचे महत्त्व सांगितले. तसेच न्यायालय व उच्च न्यायालय यांच्या न्यायालयीन कामकाजाचा फरक समजावून सांगितला. शेवटी श्री. साळवी अगदी भावूक झाले आणि अतिशय प्रेमाने आणि कौतुकाने आयोजिलेल्या हा सत्कार सोहळा म्हणजे त्यांच्या आईवडिलांनी त्यांचे केलेले कौतुक आहे असे त्यांना वाटले. आणि जमलेल्या उपस्थितांत मी माझे आई वडील पाहतो आहे असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे आभार व्याख्याता कु. मनीषा वाघ यांनी मानले आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



**न्यायामूर्ती श्री. उमेश साळवी यांचे स्वागत करताना विद्या प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले**



**न्यायामूर्ती श्री. अनिल जोशी यांचे स्वागत करताना विद्या प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले**

**अभिरूप न्यायालय :**

दि. २३ मार्च २००९ रोजी वि. प्र. मंडळाच्या विधी महाविद्यालयात अभिरूप न्यायालयाअंतर्गत खटल्याच्या सुनावणी दरम्यानची तपासणी व उलटतपासणीचा भाग काही विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. यात महाविद्यालयातील प्राध्यापक सौ. संबिता उबराल, कु. मनीषा वाघ, कु. मानसी सावे, श्री. मनोज भट व सौ. प्रज्ञा राजेबहाद्दर सहभागी झाले होते. तसेच श्री. विवेक जोशी हे विद्यार्थीदेखील सहभागी झाले हाते. कार्यक्रमाचा थोडक्यात उद्देश असा होता की, जरी महाविद्यालयात सर्व विषय अभ्यासले जातात तरीदेखील प्रत्यक्ष न्यायालयात



**अभिरूप न्यायालयाचे एक दृश्य**

गेल्यावर मात्र विद्यार्थ्यांना त्या खटल्या संदर्भात पूर्वज्ञान नसल्याने प्रत्यक्ष न्यायालयात खटल्याचे संदर्भात काय कामकाज चालले आहे हे पटकन लक्षात येत नाही. त्यादृष्टीने विद्यार्थ्यांना खटल्याची पूर्वपीठिका समजावून देण्यात आली. तसेच त्या खटल्यासंबंधी असणारे कायदे आणि त्यातील कलम समजावून देण्यात आले.

कार्यक्रमाची संकल्पना महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार यांची. महाविद्यालयाच्या प्राध्यापिका सौ. संबिता उबराल व सौ. रश्मी आचार्य यांनी ती प्रत्यक्षात आणली.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

**विद्या प्रसारक मंडळाच्या परदेशी भाषा अभ्यास केंद्राचे उन्हाळी प्रशिक्षण वर्ग :**

वि. प्र. मं. च्या परदेशी भाषा अभ्यास केंद्रातर्फे या उन्हाळी सुट्ट्यांमध्ये शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी खास फ्रेन्च, जर्मन व जपानी भाषा प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहेत.

या वर्गासंबंधी घोषणा करण्यासाठी दि. १३ मार्च २००९ रोजी पाणिनी सभागृहामध्ये एका समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

हे परदेशी भाषा वर्ग सुरू करण्याचा मुख्य हेतू म्हणजे आजच्या जागतिकीकरणाच्या युगात परदेशी भाषा शिकून मुलांना जर परदेशी व्यक्तींशी त्यांच्याच भाषेत सुसंवाद साधता आला तर भविष्यात त्यांना रोजगाराच्या अनेक सुवर्णसंधी उपलब्ध होऊ शकतील.

या परदेशी भाषा वर्गाचा कालावधी २ महिन्यांचा असेल (एप्रिल २००९ ते मे २००९). यांच्या तासिका आठवड्यातून तीन वेळा प्रत्येकी दोन तास होतील. यासाठी रु. ३,०००/- इतके शुल्क आकारण्यात येईल. यामध्ये प्रवेश फी, साहित्य इ. चा समावेश असेल. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर वि. प्र. मं. तर्फे परिक्षा घेण्यात येतील व यशस्वी विद्यार्थ्यांना मंडळाकडून प्रमाणपत्र देण्यात येईल.

परदेशी भाषा शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन या समारंभात जपानी परराष्ट्र खात्याच्या मुंबई विभागाचे श्री. तेची तोरिकाई Consulate General of Japan, Mumbai. यांना निमंत्रित करण्यात आले होते. प्रशिक्षण वर्गासंबंधी उद्घोषणा झाल्यानंतर एका परिसंवादाचे आयोजन यावेळी करण्यात आले. यावेळी श्री. तेची तोरिकाई म्हणाले की, ''भारतात जपानी भाषेचे वर्ग सुरू झाल्याचे पाहून खूप आनंद वाटतो. कारण जपानमध्ये आज जपानी भाषातज्ज्ञांना खूपच मागणी आहे.'' आज फक्त १५,००० विद्यार्थी जपानी भाषा शिकत आहेत आणि ३००० पेक्षा जास्त कंपन्या आज भारतात सुरू आहेत. तेथे जवळजवळ १,००,००० रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

श्री. तोरिकाई यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे मुंबईमध्ये SIES व रुपारेल या महाविद्यालयामध्ये ११वी व १२वी च्या अभ्यासक्रमामध्ये जपानी भाषा हा एक ऐच्छिक विषय म्हणून उपलब्ध आहे. आपल्या महाविद्यालयात देखील अभ्यासक्रमामध्ये परदेशी भाषा हा विषय समाविष्ट करण्यासंबंधी यावेळी चर्चा करण्यात आली. कला - वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यासंबंधी शिक्षणखात्याशी संपर्क साधून २०१० पर्यंत परदेशी भाषा हा विषय ११वी व १२वी च्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा प्रयत्न करतील.

तसेच श्री. तोरिकाई यांनी सांगितल्या प्रमाणे जपान परराष्ट्र खात्यातर्फे Exchange Programs for students &Teacher हा एक उपक्रम राबविला जातो. या वर्षी या उपक्रमा अंतर्गत SIES च्या १२ व रुपारेल महाविद्यालयाच्या २ विद्यार्थ्यांना जपान भेटीसाठी पाठविण्यात येणार आहे आणि डिसें. २००९ मध्ये आपल्या महाविद्यालयातीलही २ विद्यार्थ्यांना या उपक्रमाअंतर्गत सहभागी करण्याचा प्रयत्न केला जाईल.

डॉ. विजय बेडेकरांनी देखील दोन्ही देशांच्या परस्पर सहकार्याने जपानी विद्यार्थ्यांनाही भारत भेटीसाठी, आम्ही आनंदाने आमंत्रण देत आहोत असे सांगितले.

यानंतर श्री. तोरिकाई यांनी आपल्या परदेशी भाषा केंद्राला जपानी परराष्ट्र खात्यातर्फे रु. ५०,०००/- इतकी रक्कम अनुदान मिळवून देण्यासंबंधी देखील सूचना केल्या.

परिसंवादाच्या शेवटी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉ. विजय बेडेकर व श्री. तोरिकाई यांनी उत्तरे दिली आणि

आभार प्रदर्शनाने परिसंवादाची सांगता झाली.

पाश्चात्य भाषा अभ्यास केंद्राच्या प्रशिक्षण वर्गासंबंधी अधिक माहितीसाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**डॉ. व्ही. एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था**
ज्ञानद्वीप, चेंदणी बंदर रोड, ठाणे (प) ४०० ६०१
फोन नं. २५३६४४९२, २५४४६५५४
वेबसाईट : www.vpmthane.org.
ई-मेल : vnbrims@vpmthane.org.

## दिशा व्यासपीठ

विद्या प्रसारक मंडळाच्या दिशा व्यासपीठ या उपक्रमांतर्गत शनिवार २१ मार्च रोजी सायंकाळी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात जुन्या हिंदी मराठी सदाबहार गीतांचा सुश्राव्य कार्यक्रम सादर करण्यात आला.

वेळणेश्वरच्या भूमीपूजनानिमित्त झालेल्या प्रवासात एक सुरेल मैफल रंगली होती. त्या मैफलीत मंडळाशी निगडित असणाऱ्या व्यक्तींनी आपली अदाकारी सादर करावी असा विचार मांडण्यात आला होता. त्यानुसार गेली अनेक वर्षे संगीताची साधना करणाऱ्या सौ. सुमेधा बेडेकर, डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेचे संचालक डॉ. प्रभाकर केळकर व जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांच्या गायनाची ही मैफल संपन्न झाली. हिंदी मराठी चित्रपट सृष्टीस सुवर्ण काळामधील अशी गाजलेली गीते यावेळी रसिकांना ऐकायला मिळाली. श्री. सॅलोमन यांनी वाद्यावृदांची साथ केली होती.



**गीता संध्या - कार्यक्रम दि. २१/३/०९,**
**गीत संध्या - गायक कलाकार - सौ. सुमेधा बेडेकर, डॉ. व्ही. एन. ब्रिम्सचे संचालक डॉ. पी. एम. केळकर व कला / वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला सिंग**

या मैफिलीचे सूत्र संचालन विद्या प्रसारक मंडळाचे कार्यवाह श्री. अुत्तम जोशी यांनी केले.

**इ- प्रवेश :**

विद्या प्रसारक मंडळाच्या ज्ञानद्वीप परिसरात यापुढे प्रत्येक प्रवेश करणाऱ्याची संगणकीय नोंद होणार आहे.



**ज्ञानद्वीप प्रवेशद्वार नं. २ चे उद्घाटन - दि. २७/३/२००९ (कार्याध्यक्ष - डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते)**

यासाठी आवश्यक असणारी यंत्रणा कार्यान्वित होऊन इ-प्रवेश द्वाराचे उद्घाटन वर्षप्रतिपदेस करण्यात आले. सदर उद्घाटन मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

●●●

**मुखपृष्ठावरून**
**संपादकीय**
**सामूहिक विश्वासाला तडे**

ठरायला लागले. अशा विकृत संस्कृतीचे प्रक्षेपण करण्यात माध्यमेही धन्यता मानतात; कारण त्यांना टिकायचे असते. प्रत्यक्ष डोळ्यांना दिसणारा दहशतवाद समाजाचे, देशाचे देशाच्या समाजकारणाचे व राजकारणाचे नुकसान करतो हे तर खरेच आहे. पण हा न दिसणारा सांस्कृतिक दहशतवाद समाजाची अवस्था दिशाहीन करतो; मग सामूहिक विश्वासाला तडे जाऊ लागतात.

ज्या मूठभर संवेदनशील मनांना या वास्तवातील भय जाणवते ते त्याविरूद्ध आवाज उठवतात. पण कर्कश वाद्यांच्या आवाजात हा आवाज क्षीण ठरतो. लोककल्याणकारी शासन ही संकल्पना अस्तित्वात येण्याऐवजी सत्ताकारणात रस असणारे, सक्रिय झालेले समाजातील गुंड राज्यकारभारचे सूत्रधार बनायला लागतात. १९४७ साली राजकीय स्वातंत्र्य मिळाले. खरे पण कोट्यवधी जनतेचे स्वराज्य मात्र दूर राहिले हे मग वास्तव ठरायला लागते.

हे सर्व मांडण्याचे कारण, 'निवडणुकात मत कोणाला द्यायचे' असा प्रश्न सामान्य माणसाला पडतो आहे, या वस्तुस्थितीबद्दल अंतर्मुख करणे हे आहे. मतांचा जोगवा मागणारे मूठभर जे काही सज्जन लोक असतात तेही प्रवाहपतित होत जातात आणि त्यामुळे 'कोणीही आले तरी आम्हांला काय फरक पडणार आहे' असा प्रश्न नागरिक विचारू लागतो. समाजाचा निवडणूक प्रक्रियेवरील सामूहिक विश्वास डळमळीत व्हायला लागला आहे. मत देण्याचा अधिकार तर आहेच, पण ते नाकारण्याचा ही अधिकार आहे असे सामान्य मतदाराला वाटावे हे दुर्दैव आहे.


सक्रिय असणाऱ्या पण वृत्तीने दुर्जन असणाऱ्या माणसाकडे पैसा आहे, मसल पॉवर आहे व गुंडगिरीलाच जीवनशैली मानणारा उद्दामपणा आहे. ही मोठी समस्या आहे. या जोरावर ते काहीही करू शकतात, अशी सामूहिक भावना बनत चालली आहे.

जुने निकष वापरून, जुन्या चौकटींच्या संदर्भात हे प्रश्न सुटणार नाही. या अगतिक होत चाललेल्या सामाजिक वास्तवाच्या समस्या सोडवायला नवीन विचारांच्या चौकटींची गरज आहे. त्यासाठी समाजाचा सामूहिक विश्वास, मूल्यांवरील निष्ठा अविचल रहायला हवी आहे. परिवर्तनाचे संदर्भ पारखून घेतले गेले तर निवडणुका हा केवळ उपचार राहणार नाही. आज गोंगाटात विरून जाणारा आवाज आपले अस्तित्व सिद्ध करू शकेल. आजही आशेला जागा आहे. दुर्जन माणसे सक्रिय होणार नाहीत इतकी ताकद नव्या पिढीने निर्माण करावी. अर्थात लोकहितवादींनी म्हटल्याप्रमाणे ही ताकद येईल ती शिक्षणातून, सुशिक्षित किंवा शिक्षित समाजाच्या चिंतनशील कृतीची त्यासाठी गरज आहे!!

●●●

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

दुश्चितपणा म्हणजे एकाग्रतेचा अभाव.



# स्वप्न साकारत आहे...

*हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,*
*हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे*
*हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे*
*नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे*
*ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,*
*सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !*
*हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,*
*ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे*
*हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,*
*न एके यामिनी*
*दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !*
*हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले*
*ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !*
*हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,*
*मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां*
*स्वप्न दिसे साकारले*
*आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -*
*ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण*
*द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान*
*ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,*
*दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.*
*भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,*
*शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती*
*मनी जे सुजाण,*
*दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,*
*ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,*
*बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,*
*उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.*
*युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी*
*स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई*
*आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती*
*विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,*
*कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,*
*इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान*
*भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती*
*शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती*
*नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे*
*सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.*
*बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,*
*विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां*
*नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार*
*स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार*
*नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,*
*बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा*

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

☆ *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
☆ *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
☆ *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*
*अशा सुविधांनी युक्त*

| **सभागृहाचे नांव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा.ना.बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

☆ **संपर्क** ☆

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.